म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. नं. ९९००

# ताजा कलम

REFBK-0009457

वा. शि. आपटे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
२२४७८
अनुक्रम ............ विवि. ई.......
क्रमांक ११.०० ........... नों: दि: .........
३१/१०/५०

दा. क्र. ९४५८

# ताजा कलम

लेखक :
वा. शि. आपटे

इनामदार बंधु
प्रकाशन ११ वें

मूल्य : एक रुपया
पंचवीस नये पैसे

प्रकाशक :
बा. शा. इनामदार
इनामदार बन्धु
९९१ सदाशिव, पुणें २.

प्रकाशनकाल :
कार्तिक शुद्ध १
शके १८७९
[सन १९५७]

सर्व हक्क :
सौ. इंदुमती आपटे
यांचे स्वाधीन

मुद्रक :
मा. प. तळेकर
श्री दत्तमुद्रणालय,
३३५ शनवार, पुणें २.

# सुरुवातीपूर्वी—

माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांना उपयोगी पडावेत म्हणून प्रथमतः या निबंधांची निर्मिति असली तरी माझी खात्री आहे की, रसिक वाचकांनाही ते आवडतील.

या निबंधांतील कांहीं निबंध नियतकालिकांत पूर्वी प्रसिद्ध झाले आहेत. पुनर्मुद्रणाबाबत त्या नियत-कालिकांच्या संपादकांनी अनुज्ञा दिली, याबद्दल मी त्यांचे मनःपूर्वक आभार मानीत आहें.

श्री. वा. शा. इनामदार यांच्या माझ्या अनेक वर्षांच्या सुहृद्भावनेमुळें हें पुस्तक प्रकाशित होत आहे. त्यांचा मी कसा उतराई होऊं शकेन? त्यांच्या स्नेहाच्या ऋणांतच मी राहूं इच्छितों.

—लेखक

# अनुक्रमणिका


१. ताजा कलम ... पृष्ठ १
२. अवतरण ... ४
३. टीकाकार ... ७
४. ग्रंथास ... १०
५. समासांतील शेरे ... ११
६. उंबरठा ... १४
७. आता कशाला उद्याची बात १६
८. ' श्वान ' महाशय ... १८
९. अश्रु ... २१
१०. पाऊल ... २३
११. सौंदर्यपूजा ... २५
१२. चंद्राचें आत्मवृत्त ... २८
१३. आकाश ... ३१
१४. वर्षप्रतिपदेच्या निमित्तानें ३५
१५. अफत्रा ... ३८
१६. नांवांत काय आहे? ... ४३
१७. परमेश्वरास ... ५०
१८. सागरास ... ५२
१९. आईस ... ५४
२०. बाळास ... ५६
२१. शस्त्रास ... ५८
२२. स्वा. सावरकर ... ६०
२३. साने गुरुजी ... ६१
२४. खांडेकर ... ६३
२५. फडके ... ६५
२६. चन्द्रशेखर ... ६६
२७. माटे ... ६८
२८. परांजपे ... ६९
२९. रससौंदर्य ... ७१

२४५७
प्रा. क्र.
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे. स्थळप्रत.
२२८७५ दि. ९।०५
क्रमांक ७१०० नों. दि. ३१।१०।१४

१

REFBK-0009457

# ताजा कलम

मंदाकिनीला पत्र लिहून संपवलें; परंतु पत्र लिहून संपल्यानंतर मनाला नेहमी जें एक समाधान मिळतें तें कांही आज मिळालें नाही. पत्रांत कांही तरी उणीव राहून गेल्याची भावना मनांतून कांही केल्या जाईना. पत्रांत मला जें लिहावयाचें होतें तें मीं लिहिलेंच होतें; परंतु तेंच पुन्हा आग्रहाने आणि जिव्हाळ्याने खास ताज्या कलमांत सांगायचें राहून गेलें होतें. परगावीं दूर देशाला चाललेल्या मुलाला प्रकृतीला जपण्याची सूचना आई तो निघण्याच्या आधीपासून देत असते. तरीसुद्धां गाडी हलली की पुन्हा एकदा " प्रकृतीला जप. पत्र पाठव " म्हणून सांगण्याचा मोह तिला आवरत नाही. सगळें सांगून सुद्धा पुन्हा तेंच सांगण्यासाठीं ताजा कलम लिहिण्याचें मंदाच्या पत्रांत राहून गेलें होतें. आवडत्या माणसांना पत्रें पाठवणें म्हणजे फुलझाडांना पाणी घालणें, अशी आपली माझी एक कल्पना आहे. त्या पत्रांतून आपल्या स्नेहाचीं रोपटींच आपण पालवीत असतों, नाही का? मित्राशीं केलेला पत्रव्यवहार हा फुलबागेंतील सहलीसारखा आहे. मीं माझ्या मित्रांना पाठवलेलीं, लिहूनही न पाठवलेलीं व त्यांचीं मला आलेलीं पत्रें म्हणजे माझा एक छोटासा बगीचाच आहे. त्याच्याकडे जेव्हा जेव्हा मी बघतों, तेव्हा तेव्हा त्यांतील जिव्हाळ्याचें धावतें पाणी मला दिसतें. माझ्या मित्रांचीं हीं पत्रें म्हणजे त्यांच्या प्रेमळ हृदयांचा मंद परिमल आहे!

पण त्या पत्रांतील ताजीं कलमें माझीं अधिक आवडतीं आहेत. दुष्यंताकडे बराच वेळ पाहूनही, शेवटच्या क्षणीं, जातां जातां दर्भांकुर पायीं रुतल्याचें निमित्त करून निमिषमात्र शकुंतलेने जो दृष्टिक्षेप केला, व तो जेवढा राजाला प्रिय वाटला, तितकाच किंवा त्याहूनही प्रत्येक पत्रांतील ताजा कलम मला प्रिय आहे.

तसेंच पाहिलें तर सबंध पत्र लिहून झाल्यानंतर ताज्या कलमांत आणखी विशेष लिहिण्यासारखें काय आहे ? पण प्रेम हें संकोची व आग्रही पण तितकेंच असतें.

एका पत्रांत मंदाकिनीने मला आग्रहाने निमंत्रण दिलेंच होतें. आग्रह करण्यांत कुठलीही कसूर तिने केली नव्हती. तरी पण पत्र संपल्यानंतर तिने लिहिलेंच—

" याच हं ! याल ना ? आला नाही तर — तर — पण तसें नकोच. मग ? येणार ना ? यायचंच — "

शाकुंतल न लिहितां केवळ त्यांतील श्लोकचतुष्टय लिहून कालिदास अमर झाला असता, असें म्हणतात. मंदाकिनीने तें पत्र न पाठवतां केवळ ताजा कलम पाठवला असता तरी मीं तिचें निमंत्रण स्वीकारलें असतें. इतकी गोडी वाटली त्या ताज्या कलमांत.

या ताज्या कलमांतून ज्या खास भावनांची व्यक्तता होते, त्यांवरच पत्राचें मूल्य अवलंबून नाही का ? माझ्या ओळखीचे एक कॉलेज-तरुण आहेत. वडिलांना नियमित पत्र येतें त्यांचें आणि त्या पत्रांत पितृप्रेमाचा खूप गौरवहि असतो ! परंतु पत्राच्या शेवटीं एक छोटासा ता. क. असतो : " या महिन्याला कृपा करून ५० रु. च्या ऐवजीं रु. ७० पाठवावे. " या ताज्या कलमानें पहिल्या गौरवावर पाणी पडतें—हें सांगायला नकोच. ताज्या कलमामधून अंतःकरणांत मागून उठणारे विचारतरंग प्रकट होतात आणि कदाचित् त्याच कारणामुळे त्यांत अधिक सत्यात्मकता असण्याचा संभव असतो. एकदा एका आजारांतून मी उठल्यानंतर, मला मित्रांकडून आलेलीं हीं दोन पत्रें आहेत. एकाने आग्रहाने मला हवापालट करण्यासाठी त्याच्या गावीं बोलावलें आहे व शेवटीं ताज्या कलमांत माझी व वि. स. खांडेकर यांची ओळख करून देण्याचें आभिवचन आहे. दुसरा मित्र माझा अधिक निकटचा आहे. आजारांत त्याने मला पैशांचीहि मदत केली. त्याचें पत्र भाषेच्या फुलोऱ्याने विशेष रम्य आहे; परंतु पत्र पुरें करून ताज्या कलमांत लिहिलेलें आहे, " पैसे परत करण्याची सोय करावी. तशी घाई नाही; पण माझ्या हातार्शी मुळीच रक्कम नाही म्हणून सुचवावेंसें वाटतें इतकेंच ! "

या त्याच्या ता. क. ने पत्रावर चांगलेंच विरजण पडलें आहे विंचवाची शक्ति जशी नांगींत तसें पत्राचें सारें महत्त्व ताज्या कलमांत आहे. अंतः-

करणाची परीक्षा करून, त्याचें विशुद्धत्व अथवा शामिकत्व ठरवण्याचा ता. क. हा ताजवा किंवा कसच आहे म्हणा ना!

आणि म्हणूनच ताजा कलम लिहिणें फार कठीण वाटतें मला. विशेषतः आवडत्या माणसांना पत्र लिहिण्यास मी बसतों, तेव्हा विशेषच गोंधळून जातों. त्या व्यक्तींच्या सुखकर स्मृति माझ्या मनांत इतक्या असंख्य जमतात की, ताज्या कलमाची खूण म्हणून त्यांपैकीं कोणती उपयोजावी हेंच मला उमजत नाही. एखाद्या बागेंत लतांवर पानापानाआड लपलेल्या कळ्या पुष्कळ असतात व त्यांतली कोणती खुडावी हें समजत नाही. त्या स्मृतींनी, त्या गमतींनी, त्याच्या ताज्या कळ्यांनी मी माझे ताजे कलम सजवतों. ते 'तसे' ताजे कलम नसतात—! पण कधी कधी होते काय गंमत, की पत्रापेक्षा ताजे कलमच मोठे आणि अनेक होत जातात. आणि त्यांच्याकडे पाहिलें म्हणजे पत्र वीटभर आणि ताजा कलम हातभर, अशी नवी म्हण तयार करावी, असें वाटूं लागतें मला.

एवढ्यामुळे ताजा कलम महत्त्वाचा व वेचक लिहिणें ही कठिण गोष्ट वाटते मला. यक्षाला मेघाबरोबर प्रियेला खुणेची एकच गोष्ट सांगतांना जितका विचार करावा लागला असेल, तितकाच कधी कधी मलाही करावासा वाटतो. पत्राची सुरुवात मला कठीण वाटत नाही—कठीण वाटतो शेवट. समारोपाला समर्पक शब्दच सुचत नाही. एखाद्याचें स्वागत करणें सोपें आहे, पण त्याला निरोप देणें कठिण जातें. उचंबळून येणाऱ्या अनेक भावनांचा सम्यक् व मोजक्या शब्दांत परिपोष व आविष्कार करावयाचा असतो. पत्रांत सारें लिहून संपलेलें असतें. शेवटीं रुचि आणावयाची असते. मिष्टान्न आकंठ सेविलेलें असतें. आतां तोंडाला केवळ रुचि आणण्यासाठीं थोडें व स्वादिष्ट असें कांही तरी हवें असतें. भोजन व पत्र या दोहोंनाही आस्वाद आणणारी एकच वस्तु असते व ती म्हणजे ताक. ता० क० ला उपमाच द्यावयाची तर ताकाचीच द्यावी लागेल!

अशा कारणासाठी मला ता० क० मध्यें भावनात्मकता आणि अल्पाक्षर रमणीयता यांचा मिलाफ घडलेला पाहायला मिळतो. ता० क० हें पत्राचें चिमकुलें पण अत्यंत महत्त्वाचें रसात्मक अंग आहे असें मी म्हणतों तें एवढ्याचसाठी.

★ ★ ★

## २ अवतरण

मी खोलींत आलों तेव्हा तो खोलींत नव्हता. मी सहज टेबलापाशी गेलों. खिडकी उघडली. वाऱ्याचा एक मोठा झोत आंत आला. त्याच्या टेबलावर एक वही होती. तिचीं पानें फडफडलीं. कुतूहलाने मीं ती वही घेतली व चाळली. तींत उत्तमोत्तम अवतरणें सुरेख अक्षरांत लिहून ठेवलेलीं होतीं. कुठून कुठून त्याने तीं जमवलेलीं होतीं! मधमाशीच्या अविश्रान्त परिश्रमाने त्याने जमविलेला तो मधुसंचय अगदी अचानक माझ्या हातीं आला होता.

पहिलें अवतरण अवतरणाबद्दलच होतें : "अवतरण म्हणजे अभियुक्त ग्रंथकाराच्या ग्रंथांतून आपल्या मतांस पुष्टि आणण्याकरिता किंवा लेखास शोभा आणण्यासाठी घेतलेलें वचन." मालाकार चिपळूणकरांचें अवतरण होतें तें! अवतरणें व शीर्षकें यांच्या बाबतींत मला नेहमी मालाकार आणि लोकमान्य यांची आठवण होते. समर्पक अवतरणांची रेलचेल निबंधमालेंत आहेच; पण उत्तम अवतरणासहित आकर्षक मथळा टिळकांच्या लेखांना विशेष! 'प्रासाद-शिखरस्थोऽपि काको न गरुडायते" हें सुभाषितमय अवतरण त्याच्या संदर्भासह व अभिप्रायासह मला वारंवार आठवतें. दोघांच्याही निबंधांना हिमालयाची भव्यता असे आणि त्यांच्या अवतरणांत गंगेची उदात्तता व प्राचीनता असे. समर्पक अवतरणांनी त्यांचे लेख शोभून दिसत आणि त्यांच्या लेखांमुळे त्या अवतरणांनाही अमरता मिळे!

अवतरण म्हणजे निरर्थक उतारा नव्हे. तें अभियुक्ततेच्या कसोटीस उतरलें पाहिजे. त्याने स्वमतास पुष्टि दिली पाहिजे. तसेंच जें अवतरण द्यावयाचें, तें

स्वतःच्या विद्वत्तेच्या आणि वाचणाराच्या बहुश्रुततेच्या आवाक्याबाहेरचें असूनही चालत नाहीं. जे ग्रंथकार प्रायः सर्व विद्वान् ग्रंथकारांकडून उद्धृत केले जातात आणि जे ग्रंथकार रसज्ञ वाचक साधारणतः वाचतात, तेच उद्धृत केलेले बरे. शास्त्रवचन, दृष्टान्त, सुभाषित, एखादा साधा चुटका कांहीही अवतरण म्हणून वापरतां येईल. अवतरण हा एका दृष्टीने अलंकारच आहे. मात्र कोणत्या ठिकाणीं कोणतें अवतरण वापरावें, याला योजकता मात्र लागते.

अनेक शतकांवर विजय मिळवल्यामुळे अवतरणांना एक प्रकारचें तप व ओज आलेलें आहे. शाश्वत सौंदर्य व चिरकालीन सुगंध ज्यांना लाभला आहे, अशीं तीं फुलें आहेत. एखादी विलासवती आपल्या केशभूषेंत जितक्या सहजपणे व मोहकपणे तऱ्हेतऱ्हेचीं फुलें माळील, तितक्या सहजपणे व विविधतेने कुशल लेखक अवतरणांचा उपयोग आपल्या लेखांत करीत असतो. त्यासाठी अभिजात अशी कलात्मक दृष्टि मात्र असावी लागते. तीच प्रतिभेची एक कसोटी आहे.

विद्वानांची विद्वत्ता आणि युगायुगांचा अनुभव सुभाषितमय अवतरणांत साठवतां येतो, असें डिझरॅलीने म्हटलें आहे आणि तें खरें आहे. कविहृदयांतील ईश्वरी निश्वसितें अवतरणरूपांत खुलतात, चिरंजीव होतात सद्ग्रंथांतून अवतरण घेणें यांत आल्हाद आहे. आपल्या ग्रंथांतील वचन आदरपूर्वक दुसऱ्याने उद्धृत केलें तर त्यांत विशेष आनंद आहे. अवतरण हा आपल्या विचारांना पुष्टि देणारा 'आप्त' आहे. आपल्या भावना-कल्पनांना वाट दाखवणारा साक्षीदार आहे— आपली बाजू मांडणारा वकील आहे. अवतरणें हीं शास्त्रांचे 'आधार' आहेत. इतिहासाचे साहाय्यक आहेत.

परंतु अवतरणांनी फसवतातही कांही लोक. खोटीं कपोलकल्पित अवतरणें निर्मिण्याचाही कांही ग्रंथकार उद्योग करतात कधी कधी. एकच अवतरण दुष्ट-सुष्ट दोघेही वापरूं शकतात. एकाच अवतरणांतून दोन्ही अर्थ काढणारेही महाभाग असतात. दैत्य देखील विद्वद्वचनांचा आधार घेतांना दिसतात. सैतान धर्म-ग्रंथाचा आधार घेतो. जगाचा अनुभव बहुविध आहे. विद्वानांची विचारसरणी अनेक प्रकारची आहे. त्यामुळे पुष्कळदां एका अवतरणाच्या विरुद्ध अर्थाचींही अवतरणें सांपडूं शकतात. म्हणूनच अवतरणें कांही अशीं

अर्धसत्यात्मक व अर्धवट आधार देणारीं मानलीं पाहिजेत. तीं प्रसंगीं वापरणारावर देखील उलटूं शकतात. म्हणून श्रेष्ठ रसिक ग्रंथकार सहसा दुसऱ्यांचीं अवतरणें वापरतच नाहीत किंवा साहित्यिक अवतरणांना अलंकाराचा दर्जा देत नाहीत.

तरीही जॉन्सनने म्हटल्याप्रमाणे अवतरणें हीं जगांतील सर्व ग्रंथकारांचीं माननीय स्थानें आहेत.

अवतरणें लेखकाच्या बुद्धीचें वैभव दर्शवितात व त्याला लेखनाच्या प्रारंभिक अवस्थेंत मदत करतात. तीं त्याच्या समयज्ञतेची ओळख पटवतात. त्याच्या वाचनसागरांतील रत्नांचा खजिना सर्वांसाठीं खुला करतात. तीं वाचनांना ज्या संदर्भांत तीं मूळच्या ठिकाणीं आलेलीं असतात, त्याची सुखद स्मृति जागी करतात. ‘ जातीच्या सुंदरांना कांहीही शोभतें ’ हें अवतरण वाचलें म्हणजे माझ्या डोळ्यांसमोर वल्कलांनीसुद्धा मनोज्ञ भासणारी शकुंतला उभी राहते ! वाचण्यांत न आलेलीं अवतरणें देखील नवीन, अज्ञात भांडाराचें दिग्दर्शन करतात. इमर्सन् आणि क्विलर कूचसारखे लेखक त्यांच्या अवतरण देण्याच्या पटुत्वामुळेच माझे आवडते लेखक झाले आहेत.

गिरीशांची एक ओळ मला आवडते : “वाचन म्हणजे प्रियजनसंगें विमानांतुनी फिरणें ! ” किती सार्थ आणि साभिप्राय आहे हें ! लेखकाने आपल्या वाचकाला असें विमानांतून फिरायला नेल्यावर त्याने हृदयंगम देखावे दाखवायला हवेत. त्यासाठी त्यानें अवतरणांचाही वाटल्यास उपयोग करावा. त्यानें त्याच्या लेखनाचें बाह्यांग व अंतरंग दोन्ही उकलून दिसतील. नाही का ?

* * *

३

# टीकाकार

मनुष्याचा स्वभावच असा आहे की, त्याला दुसऱ्यावर टीका करणें आवडतें आणि स्वतःवरही दुसऱ्याने टीका करावी व ती आपणांस ऐकावयास मिळावी असें वाटतें—अगदी मनापासून वाटतें. घरांत कुटुंबिनीने पसंत केलेल्या चिटाच्या कापडापासून, वृत्तपत्रांतील क्षुद्र बातमीपासून, आंतरराष्ट्रीय युद्धापर्यंत — छेः प्रत्यक्ष परमेश्वराच्या अस्तित्वापर्यंत असा एकही विषय नाही की, ज्यावर माणसाने टीका केलेली नाही.

टीका करण्याप्रमाणे टीका ऐकणेंही त्याला आवडतें. लोक आपल्याबद्दल काय बोलतात, हें ऐकण्यासाठी कितीदा तरी प्रत्येक मनुष्य चोरून आणि भिंतीला कान लावून उभा असतो. त्याचें टीकाकारावर विरोधी प्रेम असतें. माझ्यासारखा कुणी तरी, केव्हा तरी समानधर्मी जन्म घेईल आणि माझ्या नाटकांतील रहस्य त्यालाच कळेल. पृथ्वी विपुला आहे, काल अनंत आहे — म्हणून टीकाकारांना धुडकावून लावणारा कवि भवभूति — आपलें नाटक घेऊन कालिदासाकडे गेला आणि त्याने त्याचा अभिप्राय विचारला, अशी दंतकथा आहे!

टीकाकाराची मोहिनी विलक्षण आहे. आपल्या कल्पनेला किंवा कृतीला टीकाकारांची संमति मिळाली की फार मोठा आनंद होतो व समाधान वाटतें आणि आत्मविश्वास वाढतो. एखाद्या रमणीने वल्लभाला भेटण्यासाठी सर्व शृंगार करून निघावें आणि आपल्या सखीला आपल्या सौंदर्यसाधनेबद्दलचा अभिप्राय नजरेने विचारावा, "अं? ठीक झालं ना?" ती रसिका रमणीच्या सौंदर्याची स्तुति तर करतेच; पण अन्य दुष्ट टीकाकारांची दृष्ट लागूं नये

म्हणून रमणीच्या गालावर गालबोट लावायलाही विसरत नाही. नव्या लेखकांना वाचकांपुढे येतांना असाच एखादा टीकाकार लागत असतो. गुणांबद्दल उत्तेजन देऊन दोषांच्या गालबोटांचेंही कौतुक करणारा व सहृदय !

गुणांची स्तुति करणारे टीकाकार किंवा स्तुतिपाठक पुष्कळ मिळतात— पण दोषांची जाणीव देणारे निरपेक्ष टीकाकार क्वचितच लाभतात. निंदा नि दोषनिवेदन हें खरोखरच कठीण पण लोकहितप्रद कार्य आहे. निंदकाचें माहात्म्य मोठें आहे. निंदक आपल्याला कुमार्गापासून दूर ठेवतात. सत्पदा-पासून आपली निवृत्ति केव्हां होते याची ते वाटच पाहात असतात आणि त्यांना तशी संधि न देणें यांतच आपलें उदार चारित्र्य आहे. दोषदर्शन हें समाजाला अत्यंत कटु वाटणारें पण अत्यंत हिताचें आहे. सद्गुणांची प्रशंसा हें टीकाकाराचें व्रत असलें तर दोषविडंबन हेंही त्याचें एक कर्तव्य आहे. या कर्तव्यासाठी, या सत्य परंतु अप्रिय कथनासाठी अनेक टीकाकारांना लोकांचा रोष आणि क्वचित् अज्ञातवासही पत्करावा लागला आहे. पण त्यांच्या व्रता-पासून खरे टीकाकार कधी च्युत होत नाहीत. टीका हें त्यांचें शस्त्र - तीक्ष्ण आहे तें ! पण ते तें योग्य ठिकाणींच वापरतात. त्यांत त्यांचें कौशल्य आहे आणि त्यांतच त्यांचा गौरव देखील आहे !

टीका करणें म्हणजे पुष्कळच सोपें काम आहे, असें पुष्कळांना वाटतें. आणि पुष्कळदा होतेंही तसेंच. ज्यांना कांही येत नाही ते टीकाकार होतात. ज्यांना कवितेची एक ओळही येत नाही, ते काव्यांचीं परीक्षणें करतात. ज्यांना टीकाशास्त्राचा गंधही नाही, ते एखाद्या लेखकावर टीकास्त्र सोडून अगदी तुटून पडतात. दुसऱ्याच्या भांडवलावर स्वतःचा मोठेपणा वाढविण्याचा हा एक राजमार्ग आहे. दुसऱ्याला नांवें ठेवून ते स्वतः नांव कमावतात. असे जे टीकाकार—ते खरे टीकाकार नव्हत. साहित्यमंदिरांतील बडवे ते. नवोदित लेखकांनी आणून ठेवलेल्या प्रसादाला नांवें ठेवीत स्वतःचा बडेजाव वाढवणारे हे टीकाकार? हे कसले टीकाकार? उदयोन्मुख लेखकाचे पाय ओढून त्याच्या स्फूर्तीचें अपहरण करणारे ते निव्वळ वाटमारे म्हटले पाहिजेत.

कवींना निरंकुश असें म्हणतात; पण टीकाकार त्याच्याहीपेक्षा निरंकुश ! त्याच्याहीपेक्षा स्वच्छंद ! कारण निरंकुश कवींवरही हे तुटून पडणार आणि

त्यांना जेरीस आणणार! छे:! टीकाकारांना निरंकुश म्हटलें हें थोडेंसें चुकलेंच. या टीकाकारांजवळ न्यूननिदर्शन, उपहास, वक्रोक्ति, उपरोध इत्यादि अनेक अंकुश असतात. या अंकुशांनी प्रभु रामचंद्रापासून, आर्य चारुदत्तापासून सर्व लहानथोर व्यक्तींना काय थोडा त्रास दिला आहे? या शस्त्रांची धार किती प्रखर आहे याची कल्पना हवी असेल तर मेकॉले, जेफरे, श्रीपाद कृष्ण, शिवरामपंत यांचे टीकालेख वाचा.

असें जरी आहे तरी टीकाकारांचें हें टीकास्त्र अभिजात प्रतिभेपुढे, नव-नवोन्मेषशाली स्फूर्तीपुढें टिकाव धरूं शकत नाही. टीकाकार असल्या विषारी शरसंधानाने मोरपिसें लावलेल्या डोमकावळ्याची फजिती करूं शकेल; पण सरस्वतीच्या कृपेस पात्र झालेल्या मयूरांच्या प्रतिष्ठेला हात लावूं शकणार नाही. अभिजात लेखक पुढे आपल्या काव्यप्रासादांत हे टीकाकारमूषक बिळें करतील म्हणून काव्यप्रासाद रचण्याचें सोडून देतात काय? मुळीच नाही. त्याचें कारण असें आहे की, "प्रत्येक उत्कृष्ट ग्रंथकार हाही मूलतः उत्कृष्ट टीकाकार असतोच!" सौंदर्यशोधकता, सदसद्विवेक, रसग्रहणशीलता, निरीक्षणसूक्ष्मता दोघांनाही लागतात. काव्य व त्यावरील टीका वस्तुतः एकाच सौंदर्यास्वादाचीं दोन रूपें आहेत. ज्ञानेश्वर, वामन, मोरोपंत हे उत्कृष्ट कवि आहेत व उत्कृष्ट टीकाकारही आहेत. पहिल्या प्रतीचे ग्रंथकार हे बहुशः पहिल्या प्रतीचे टीकाकारही असतात. अन्य टीकाकारांच्या प्रहारानें त्यांची प्रतिभा क्षणभरसुद्धा हीनप्रभ होत नाही.

टीकाकार हा सायंकाळच्या सुशीतल वायुलहरींसारखा आहे. अज्ञात प्रदेशांत फुललेल्या फुलांचा सुवास तो रसिकांना पुरवतो आणि लाजणाऱ्या कित्येक अर्ध-स्फुट प्रतिभापुष्पांना फुंकर घालून फुलवतो, खुलवतो. टीकाकार हा भ्रमरासारखा आहे. तो फुलांतला मध काढून घेतो, पण फुलांच्या विकासशक्तीला धक्का लावीत नाही टीकाकार हा कुशल शिल्पी आहे. मूळ ग्रंथांतील लक्ष्य व व्यंग-सौंदर्य, टाकीच्या नव्हे, टाकाच्या नव्हे—टीकेच्या धारेने तो प्रकट करून दाखवतो. वाचकाला मूळ ग्रंथांत जेथे अगदी शंकाही येणार नाही, तेथेही तो उत्कट आणि मूर्तिमंत काव्यात्मकता निदर्शनास आणतो. ब्रॅडलेची शेक्स्पि-अरवरील टीका, जॉन्सनचें कविचरित्रांचें परीक्षण, मल्लीनाथ, धनंजय, टागोर अशा थोर टीकाकारांनी केलेला रसास्वाद पाहिला म्हणजे क्षणभर मूळ

ग्रंथापेक्षाहि टीकाग्रंथच अधिक प्रिय वाटूं लागतात. त्यांच्यासारख्या मार्मिक, रसज्ञ, सहृदय टीकाकारांच्या टीका–टीका कसल्या–काव्यानंद शोधणाऱ्या रसिक वाचकांसाठी फुललेल्या वाटिकाच त्या! रसज्ञ वाचक तर अशा टीकाकारांचें स्वागत हर्षभराने करतीलच; पण श्रेष्ठ ग्रंथकारहि असे टीकाकार लाभणें महत् भाग्याचें मानतात आणि असा समानधर्मा कधीं तरी कुठे तरी या अपार पृथ्वीवर अवतरेल म्हणून वाट पाहात बसतात.

* * *

## ४ ग्रंथास

**तुझ्याइतका** विद्वान् कोण आहे या जगांत? पण लक्षांत ठेव, सारी विद्वत्ता तुझ्याजवळ आहे असा गर्व वाहूं नकोस. आयुष्यांत एकही ग्रंथ न वाचणारे लोकही विद्वान्, धोरणी व शहाणे असूं शकतात.

तूं सत्यनिष्ठ समजला जातोस, ग्रंथांत लिहिलेलें तें सारें खरें अशी पुष्कळांची समजूत असते; परंतु सुज्ञ जाणतात की, तूं दोन्ही बाजूंनी साक्ष देणारा फसवा साक्षीदार आहेस हें!

ग्रंथ समाजाच्या आनंदाचें निधान आहे व ज्ञानार्जनाचें एक उत्कृष्ट साधन आहे असें म्हटलें जातें. तरी देखील हेंही एक सत्यच आहे की, एका काळीं ग्रंथ नव्हते आणि त्याही काळीं समाज ज्ञानी होता, आनंदी होता.

आणि कुणी म्हणतात, "ग्रंथ आपले मित्र आहेत." साफ खोटें. व्यवहारी जगाची व आपली फारकत करणारे, आपल्याला पढतमूर्ख बनवणारे, कल्पना-सृष्टींत रमण्याचें वेड लावणारे हे ग्रंथ — हे कसले मित्र?

ग्रंथा, बाह्यांग कधी कधी फार चांगलें असतें रे तुझें! पण तुझ्या अंतरंगांत, तुझ्या निर्मात्यांच्या अनौचित्याचें प्रतिबिंब पडलेलें असेल आणि तुझ्यामुळे वाचकांच्या क्रिया पालटत नसतील तर व्यर्थ तुझें जीवन !

तुझ्या भजनीं पुष्कळ लोक लागले आहेत. त्यांच्या या भक्तीचें पारितोषिक त्यांना सर्वांना काय मिळत असेल तें असो,·पण येथे तरी त्यांचे पुस्तकी किडे झालेलेच आम्ही पाहतों.

तूं जगांतील सर्व भाषा, समाज, देश, व्यापून राहिला आहेस. त्यांच्यावर विजय मिळवूनही तुझें रूप पांढऱ्यावर काळें अशा योग्यतेचेंच उरलें आहे— आम्हांला रक्ताच्या शाईने लिहिलेलीं पानें हवीं आहेत !

* * *

... संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
... २२७८६ दि: ...
क्रमांक ... २२०० ... नों: दि: ...

## ५ समासांतील शेरे

घंटा झाली. प्रोफेसरसाहेबांनी पुस्तक मिटलें. मिटतां मिटतां घंटा देण्यास खूप उशीर केल्याबद्दल हसतच कांही कोटी केली. खिशांतून रुमाल काढून तो कपाळावरून अगदी सहज फिरवीत ते वर्गाबाहेर पडले. त्यांच्या मागोमाग सर्व विद्यार्थिनी आणि विद्यार्थी बाहेर पडूं लागले. वर्गातलें हसतें-खेळकर वातावरण अजून निमालें नव्हतें. दारांतून जाण्यास वाट झालेली पाहून मी उठलों. फौंटन खिशांत ठेवलें. वही मिटली. इतक्यांत माझी नजर समोरच्या

बाकावर गेली. तेथे एक वही विसरलेली दिसली. कुणाची आहे तें पाहून ज्याची त्याला– जिची तिला– परत करावी याच विचाराने ती वही मीं उचलून घेतली.

त्यानंतर मधली सुटी होती. वही घेऊन दूर एका झाडाखाली गेलों. हो, कुणीं तरी बघितलं तर चेष्टेला विषय मिळायचा! पहिल्या पानावर वेलबुट्टींत नांव घातलें होतें. अक्षर तिरकस पण सुरेख होतें. टापटीपही छान होती. प्राध्यापकांनी लिहून दिलेला मजकूर पद्धतशीर लिहून घेतला होता, पण मला त्याचें नवल वाटलें नाही. माझें लक्ष खिळलें तें निराळ्याच गोष्टीवर!

त्या मजकुरावर समासांत लिहिणारानेच शेरे दिले होते. प्रोफेसर शिकवत असले म्हणजे पुढच्या बाकावर बसून बोलतां येत नाही आणि एखाद्या वेळेस बोलण्याचा प्रयत्न केलाच तर तो इतक्या हळू आवाजांत करावा लागतो की, शेजाऱ्यास आपलें बोलणें ऐकूं जाणार नाही. मग नाहीच बोललें तर? पण तसेंही राहवत नाही. सहज सुचलेली कल्पना, ओठापर्यंत आलेला शब्द, स्फुरलेला विनोद, भावनेचा उद्रेक का मागे हटवतां येतो? मग समासांत, कोऱ्या पानावर, शेवटच्या कव्हरवर तें उतरतें आणि शेजाऱ्याकडे जातें आणि प्रत्युत्तरासह तें मग माघारें येतें! या माझ्या समोरच्या वहींत असे सामासिक उद्योग बरेच होते—

वाचन–लेखन करीत असतांनाही मन दुहेरी काम करीत असतें. कादंबरी, लघुकथा वाचतांना तें समरस होतें व त्याच वेळीं तें टीकाकारही बनतें. वर्गांत व्याख्यानें ऐकतांना तें असल्या समासांतल्या शेऱ्यांतही रमतें! या पाहा एका समासांत किती नाना प्रकारच्या सह्या करून ठेवल्या आहेत. प्रत्येक सही करून झाल्यानंतर ती तपासून पाहतां, त्यांतील अक्षरसौंदर्य पाहतां त्या सौंदर्यवतीने कसे अंगविक्षेप केले असतील, भुवया उंचावून, ओठ मुडपून व हनुवटीवर पेन ठेवून सहीकडे पाहिलें असेल, त्याचें चित्र मनासमोर येऊन गेलें माझ्या.

पुस्तकें वाचण्यापेक्षा कधी कधी माझ्यासारख्या चोखंदळ माणसाला पुस्तकाच्या कडेला असलेल्या छोट्या जागेंत दुसऱ्या वाचकाने दिलेले शेरे वाचण्यांत अधिक आनंद होतो. दोन-चारच शब्द असतात! एकदा

माझ्या मैत्रिणीकडून मीं 'पाणपोई' वाचायला आणलें — नुकताच तिचा विवाह झाला होता — वाचतां वाचतां मी थबकलों.

येशि कशाला दारीं ऐसा ऐन दुपारीं—
भीक हवी जरी
झोळी रिती परी —

या ओळींससोर एकच उद्गारचिन्ह होतें — बारीक, पेन्सिलीनें केलेलें — आणि तेंही अश्रूंनीं धुऊन गेल्यानें पुसट झालेलें! अश्रुबिंदु असला पाहिजे तो! मला वाटे, समासांतले शेरे तेवढे कुचेष्टेतूनच जन्मत असतील, पण मला सत्य अनुभव निराळा आला!

वाचनालयांत प्रत्येक पुस्तकांत पेन्सिलीच्या खुणा, प्रश्नचिन्हें आणि इतर शेरे आढळत नाहीत? कांही अभ्यासू वाचक तर पुनरुक्ति, तुल्य कल्पना, चुकीचें विधान, पुढें पाहा पृ × × असे शेरे मारीत असतात. मला तरी अशा सर्व खुणांनी भरून गेलेलें पुस्तक कोऱ्या पुस्तकापेक्षा अधिक आवडतें.

एकीकडे मजकुरांत मन रमलेलें असतेंच; पण त्याच वेळीं आपल्या अनोळखी मित्राकडून 'कथानकांत विसंगति, कृत्रिमता, स्वभावरेखाटनांतील दोष—' असे शेरे मी ऐकतों. चित्रपट पाहायला नाही का आपण कुणाबरोबर जात? मग पुस्तक वाचतांना असा अदृश्य वाचक जवळ असला तर बिघडलें कुठे? मी तर त्याला विशेष पसंत करतों. आगगाडीच्या घडघडाटांत आपण वाचतों, वाऱ्याने पानें फडफडत असतांही आपण वाचतों. मग हा अनाहूत मित्र त्रास देत असला तरीही वाचायला काय हरकत आहे? पुष्कळ विद्यार्थ्यांचीं पुस्तकें खुणाशिवाय, कोरीं करकरीत राहतात — मला नाही पटत. मला वाटतें, हे वाचक इतके कोरे निर्लेप राहतात तरी कसे?

समासांतील जागा वाचन चालू असतांना उत्पन्न होणाऱ्या सुखदुःख भावना पेरण्यासाठीच आहे. मनांत आलें आणि तें बोलून वा लिहून टाकलें, हें बालमनालाच शक्य आहे. अभ्यास करतांना निळ्या-जांभळ्या खुणा होतील पुस्तकांत. परंतु त्यांत गंभीरता आहे, कृत्रिमता आहे — पण पुस्तक वाचतांना आनंद झाला व तो उतरला गेला, 'सुंदर!' मनाला वाईट वाटलें व अश्रुबिंदु ठिबकला, तिथेच आश्चर्य वाटलें — तें आलें खाली उद्गाररूपें — कोणत्याही

पुस्तकाच्या टीकांमध्यें हे समासामधले शेरे सर्वोत्कृष्ट नाहीत काय ? हे शेरे प्रशस्तिपत्रकें नव्हेत काय ? खरंच, ज्या लेखकाचें पुस्तक अशा सहृदय व तात्काळ मतप्रदर्शन करणाऱ्या वाचकाकडून वाचलं जात असेल, त्या लेखकाचा हेवा वाटतो मला !

★ ★ ★

## ६ उंबरठा

स्थित्यंतराच्या सीमारेषा किती पुसट असतात नाही ? रात्र संपते केव्हा आणि पहाट होते केव्हा, हें सांगणें कठिण आहे. झोप संपून जाग केव्हा येते, जागृतीमधून झोप कशी सुरू होते, तारुण्य व वार्धक्य, मंगलता व अमंगलता यांच्या सीमारेषा कुणी निश्चित करूं शकला आहे का ?

व्यवहारासाठी आम्हीं म्हणायचं,सहा वाजून आठ मिनिटांनी सूर्योदय झाला आणि गोरज मध्ये सहा वाजून चौतीस मिनिटें ! व्यवहारासाठी आम्हीं विपुला पृथ्वीचे देश, प्रांत, जिल्हे आणि सर्वे नंबर पाडायचे ! आणि काळाचे पळापळाचे तुकडे करायचे. एवढंच नाही तर त्याबद्दल एवढा जिव्हाळा उत्पन्न करायचा की, बोलायची सोयच नाही ! विच्छेदन आणि पृथक्करण, सीमा आणि कुंपणें-उंबरठे यांशिवाय आम्ही जगूंच शकत नाही. अनादि अनन्त स्थळ-काळ-जीवन यांचें साकल्यानें आम्हांस दर्शनच घेतां येत नाही !

जेथे तेथे आम्हांस कुंपणें हवींत, उंबरठे हवेत, लक्ष्मणाच्या सीमारेषा हव्यात. हें माझें, हें तुझें, या हद्दींत येऊं नकोस, त्या रेषेच्या पलीकडे गेलास

तर पाप लागेल! या सीमोल्लंघनाला विशेष महत्त्व! असल्या सीमा - प्रश्नांचें आम्हीं विशेष महत्त्व माजवलें आहे.

आणि प्रत्येक सीमेवर आम्ही आकर्षक कमानी उभारतों, भय पेरतों, पराक्रमालाही आवाहन देतों. कधी थबकतों, कधी दुसऱ्याला अडवतों! कांही स्थित्यंतरांचीं प्रवेशद्वारें आम्हीं विशेष सजवलीं आहेत. गर्भाधान-पुंसवनापासून जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर आमचा भरपूर उत्साह दिसून आला आहे. जावळ, उष्टावण, व्रतबंध, व्रतसमाप्ति—दर वेळीं आमच्या स्थित्यंतरांची आम्हीं प्रसिद्धि केली आहे!

पण स्थित्यंतराची ही प्रसिद्धि आम्हीच करतों असं नाही, तर निसर्गही तेंच करतो. वर्षाऋतु ग्रीष्माच्या उंबरठ्यावर येतो तो काय गुपचूप? गर्जत, विजेचे लोळ घेत, धडधडत आणि गारांचा वर्षाव करीत, मातीचे लोट उठवीत, वादळ मांडीत येतो—आणि पहाटे उषाराणी येते. निशेच्या दारीं तीसुद्धा पक्ष्यांचा किलबिलाट, दिशांचा धुंद सुगंधी व सुरंगी दिमाख घेऊन! उषादेवीच्या पदयुग्मांचा लालगुलाबी रंग इथे उमटला आहे!

दिवस मावळतो आणि निशादेवी येते उंबऱ्यांत, तेव्हा तिच्या रुपेरी नूपुरांचा झंकार इथे उधळला जातो. या निसर्गाच्या उंबऱ्यावर मधुयामिनीचीं तरल स्वप्नें रेंगाळलीं आहेत—हा निसर्गाचा उंबरा—जेथे सागर - आकाश भेटलें—तो सोडला आणि माझ्या घराचा उंबरा बघितला, तर माझ्या मनांत अनेक चित्रांचा चलत्पट सरकूं लागतो. हा उंबरा—इथे नरसिंहाने दुष्ट हिरण्यकश्यपूच्या रक्ताचा सडा घातला आहे! या उंबऱ्यावर बटु वामनाला—त्या देवाधिदेवाला—भिकारी बनून बळिराजाच्या द्वारांत द्वारपाल म्हणून उभें राहावें लागलें आहे. मांगल्य-सूचक गुढ्या तोरणें इथें उभारलीं आहेत, तर इथेच अमांगल्याची परिहारक काळी बाहुली टांगली गेली आहे.

या उंबऱ्यावरून आंत "आईऽ अऽ शाळा सुटली!" करीत लहान मुलें आतुरतेने धावलीं आहेत. या इथेच कुणी तरी कुणाची तरी वाट पाहत प्रहर अन् प्रहर तिष्ठलें आहे. या उंबऱ्यावर पराक्रमी पुरुषाला रणांगणावर नियतांना सौंदर्यवती प्रणयिनींनी प्राणांच्या पंचारतींनी ओवाळलें आहे आणि इथेच रणांगणावरून परतल्यानंतर हर्षभरानें स्वागतलें आहे!

या उंबऱ्यावरून मला नेहमी जिवतीच्या कहाणीची आठवण होते. उंबऱ्यावर डोकें ठेवून झोपणारा तो पाहुणा आठवतो ! सटवीला परत जायला लावणारें तें व्रत ! या उंबऱ्यावरून किती तरी अमंगल गोष्टी मागे सारल्या आहेत. तो भूत-प्रेतासाठी ओवाळून टाकलेला भाकरीचा तुकडा—स्मशानाच्या शेवटच्या वळणाला विसावा म्हणतों आम्ही— ! – किती विचित्र कल्पनांनी मन बावरून जातें .....

सकाळच्या वेळीं सारवलेला, गोपद्में काढलेला तो पवित्र उंबरा, सांजच्या वेळीं दिवाळींत फुलबाज्यांनी नटणारा उंबरा, तांब्या-रुप्याच्या नाण्यांनी समृद्ध झालेला देवद्वाराचा उंबरा ! किती भिन्न रूपांत तो मला दिसतो ! या उंबऱ्याच्या आंत मंगलाचें माहेर असावें, ऐक्य असावें, रोज सांजवात लागावी, सारी अमंगलता, मलिनता या उंबऱ्याबाहेर रहावी, असें मला वाटतें. या देहलीवर दीप लागून अंतर्भाग आणि बाह्य जग दोन्ही उजळून निघावींत असें मला वाटतें. किंवा कधी कधी मनांत येतें—उंबरा हा ममत्वाची सीमा म्हणून राहू नये. ती इतकी मोठी असावी की, सारें विश्व माझ्या घराच्या आंत येईल !

★ ★ ★

७

## आता कशाला उद्याची बात ?

ओठाला आलेला पेला खळकन् पडावा अन् फुटावा, हातातोंडाशीं आलेलं पीक करपून जावं, वृद्धपणीं काठीसारखा उपयोगी पडेल या आशेने सांभाळलेला तरणाताठा मुलगा एक दिवस अचानक काळाने ओढून न्यावा—किती विदारक घटना आहेत या !

उद्या एका पैशाचे दोन होतील, उद्या पर्जन्य वेळेवर पडेल, अन्नवस्त्र यांची विपुलता होईल, उद्या सगळ्या जगांत समानता, बंधुत्व व ऐक्य यांचें संगीत निनादेल, उद्या सोन्याच्या ताटांत रत्नांचे दिवे माणकांच्या वातींनी व हिऱ्यांच्या ज्योतींनी चकाकतील, पण उद्या–उद्याची ही स्वप्नसृष्टि. इंद्रधनुष्याच्या रंगांनी आकाशाच्या फलकावर चितारलेलीं हीं कल्पनाचित्रें खरीं होणार आहेत का ? कल्पनेंतल्या अन्नपदार्थांनी भूक भागणार आहे का ? मृगजळाने तृष्णा शमेल का ? चित्रांतल्या अलंकारांनी आपलें शरीर नटवतां येईल का ?

खरंच, तसें होतें तर किती छान झालें असतें. उद्याच्या गोष्टी म्हणजे ढगांचे पापुद्रे ! काळ हा प्रचंड संहारक आहे व त्याचें अपत्य आहे हें 'उद्या !' आशेच्या पोटीं 'उद्या' जन्माला येतो खरा, पण तो मातृमुखी व सदासुखी असेल, याची खात्री नाही देतां येणार !

उद्या ? कशाला हव्या उद्याच्या गोष्टी ? आजच्या या क्षणावर मात्र आपली सत्ता आहे. आता उमललेलें फूल आणखी एका क्षणांत सुकूं लागणार आहे ! आता प्रकाश देणारा हा दीप क्षणाक्षणाने मंदावत जाणार आहे ! आता आपल्या सौंदर्याचा प्रभाव मिरविणारी ही प्रमदा क्षणाक्षणाला वृद्ध बनत चालली आहे. पण कुठे आहे जाणीव त्याची ?

पायांखालची वाळू सरकावी, घड्याळांतली वाळू गळत रहावी, पळापळाने सूर्यचंद्र पुढे सरकावेत व आपण मात्र अमर होण्यासाठी धडपडावें–खुळेपणा नाही का हा ? म्हणून—

आहे हा क्षण भाग्याचा, हा क्षण सौभाग्याचा, हा क्षण सौख्याचा, या क्षणांत काय करायचें तें करा आणि तें चांगलेपणाने करा. हंसायचें, गायचें, बोलायचें, हिंडायचें, फिरायचें–काय करायचें असेल तें आता करून घ्या. या क्षणाला खेळूं, खाऊं, पिऊं, मजा करूं. एकदा गाडी सुटली, सांधे बदलले म्हणजे ती माघारी येणारी नाही !

तो पाहा काळपक्षी ! त्याने आपले पंख विस्तारले आहेत. आता तो उडून जाण्यास क्षणाचाही विलंब नाही. नदी पुढे धावते, माघारी नाही. कालचें सुख आज पुन्हा मिळणार नाही. आजचें आजच फक्त–आज नको म्हणून उद्यासाठी तें राहाणार नाही ! आज ! आता–उचला रोखीने !

काल आणि उद्या. काल हा अश्रूंनीं भरलेला कुंभ आहे. उद्या मृगजळाची सुरई! आज हाच एकमेव जीवनाचा पेला आहे. उचला तो. ढवळा. त्यांतील फेस भराभर उसळूं द्या. उन्माद येईल. हरकत नाही. जीवनाचा उन्माद वैराग्यापेक्षा शतपट बरा. आजच्या सुखज्वालांत समाधि घेणारा पतंग रात्रभर चक्रवाकीसाठी तळमळणाऱ्या चक्रवाकापेक्षा श्रेष्ठ वाटतो मला. आजच्या वास्तवांतील चण्याफुटाण्यांची किंमत मेल्यानंतरच्या बासुंदीपुरीपेक्षां अधिक आहे! म्हणून म्हणायचें—

जरा उशीर कराल तर, कुणास ठाऊक, कदाचित् हा पेला फुटेल, नाही तर तुमचें पार्थिव शरीर तरी भंगेल. चला, उठा, लुटा हें सौंदर्य, हें काव्य, हें वैभव! जरा उशीर कराल तर हे सौंदर्याचे दंवबिंदु विरघळतील. आणि मग नाही राहणार गीत, नाही राहणार बासरी. म्हणून पुन्हा सांगतों—उठा, लुटा हें आजचें सुख — आता कशाला उद्याची बात?

* * *

## ८ ‘श्वान’ महाशय

तुम्ही म्हणाल, काय पण विषय निवडला आहे लघुनिबंधासाठी! प्राण्यांवरच लिहावयाचें तर तरुणींच्या नेत्रांशीं स्पर्धा करणारीं हरिणशावकें नव्हतीं? स्वयमेव मृगेंद्रता प्राप्त करून घेणारा वनकेसरी नव्हता? गजान्तलक्ष्मीचें वाहन गजराज नव्हते? आणि हेंही सुचलें नसतें तर उमदे घोडे होते, भोळे नंदी होते, लबाड कोल्हे होते, किती तरी होते! कुत्र्यांत काय पाहिलेंत तुम्हीं?

गाय दूध देते, घोडे टांगे ओढतात, उंट सहारा तुडवतो, कुत्रीं काय करतात ? हं! कुत्रा म्हणे इमानदार प्राणी आहे! कसली इमानदारी! रात्रभर एकसारखं भुंकणं याला जर इमानदारी म्हणायचं असेल तर आमचं कांही म्हणणं नाही.

आतां काल-रात्रीचीच गोष्ट. अकराचा सुमार असेल. एका श्वानमहाशयांची तब्बेत जरा गरम झाली आणि ते आपल्याशीं जरा गुरगुरले. झाऽलं. पलीकडल्या बंगल्यांतल्या त्यांच्या जोडीदारानें भों भों करून साथ दिली. एवढ्यांत सिनेमाहून परतणाऱ्या कुणा गृहस्थाने त्या कुत्र्यावर काठी उगारली असेल अशी शंका तिसऱ्या कुत्र्याला आली आणि त्या शंकेचें सदनशीर निवारण वा चौकशी न करता आळींतली सारी श्वानप्रजा एकत्र संघटित झाली आणि एकदम आंदोलन सुरू झालें. मीं खिडकींतून बाहेर डोकावून " शांत राहा! एका वेळीं एकाला काय तें सांगूं द्या!" म्हणून पुकारा केला. माझें ऐकतो कोण? आपली भुंकण्याची हौस भागवण्यासाठी हीं सारीं नदीकिनारीं वा मसणांत कां जात नाहीत कुणास ठाऊक? गावांतल्या गल्लीबोळांतील लोकांची वृथा झोपमोड कां? या कुत्र्यांच्या गायनाला कांही ताळ? कांहीं वेळ? कांही मेळ? प्रसंग नाही—निमित्त नाही—कांही नाही—आलें मनांत की लागले भुंकायला! आणि एकाने भुंकणें सुरू केलें की बाकीच्यांनी त्याला साथ दिलीच!

रात्रीच्या वेळीं—एखाद्या गल्लींत, मरतुकडें, चोपलेलें, चिंचोळें आणि लूत भरलेलें कुत्रें आपल्या तंगड्या व वाकडी शेपूट लांब करून रस्त्याच्या मधोमध पडलेलें असतें. चुकूनच त्याच्या पुच्छाग्राला आपला ओझरता स्पर्श व्हावा आणि मग महाराज, पाहा त्या कुत्र्याचा आवेश! मग कळेल कुत्रा ही काय चीज आहे! आपण फटफटीवर बसून खेडेगावांत जरा रपेट करून या म्हणजे कळेल या तथाकथित गावठी कुत्र्यांचा पाठलाग कसा असतो तें!

आपण गाडींतून जात असावें, हजार वेळा पोंकार वाजवावा, आणि एखादी श्वानमहाराजांची स्वारी आपल्या इशाऱ्यांचा धिक्कार करीत तपस्व्याच्या गतीने रस्ता ओलांडीत असावी. आपली सभ्यता, संस्कृति, विद्वत्ता, सामर्थ्य, उंची पोषाख सारें व्यर्थ आहे यांच्यापुढे! आपण एखाद्या बड्या गृहस्थांना भेटायला त्यांच्या दारांत यावें आणि दीडदमडीच्या एका कुत्र्याने आपला मार्ग रोखावा, म्हणजे पटेल तुम्हांला कुत्र्याची योग्यता-एरवी नाही.

आणि तरी तुम्हांला कुत्रा प्यार वाटावा ? मोठें आश्चर्य आहे म्हणायचें. कुत्र्यामांजरांच्या पायांसारखें अक्षर आपणांस प्रिय असेल! कुत्र्याचें जिणें, कुत्र्यानें हाल न खाणें, कुत्र्याच्या मौतादीनें मरणें हें सारें आपणांस प्रिय असेल, तर आम्हांस कांही म्हणायचं नाही ! पण तुम्ही तशांतले नाही. गव्हाणींतला कुत्रा आणि कुत्र्याचें वाकडें शेपूट तर सुप्रसिद्धच आहे ! का या त्याच्या विशेषावर भाळलांत ?

हं, कदाचित् संस्कृत वाङ्मयाचे आपण मोठे पढिक व्यासंगी असाल ! श्वा-युवा–मघवा यांना एका पंक्तींत गोवलेलें वाचनांत असेल आपल्या–म्हणून श्वानाचें महत्त्व आपण सांगणार असाल ! शुनःशेप आणि सारमेयी यांच्या कथा वेदवाङ्मयांतून काढून ऐकवणार असाल. धर्मराजाबरोबर स्वर्गद्वारापर्यंत पोहोचलेल्या श्वानाचें माहात्म्य वर्णन करणार असाल–आपल्या दाढेंतून निघणारें रक्त आपणच चघळणाऱ्या, आणि त्या मायेंत गुरफटलेल्या कुत्र्याचा दृष्टान्त देणार असाल–नाही तर दत्तोपासनेंतील श्वानमहिमा गाणार असाल !

ऐतिहासिक काळांतील कुत्र्यांच्या कार्याचा संशोधनात्मक प्रबंध रचूं नका कृपा करून. हल्लींचीं कुत्र्यांचीं प्रदर्शनें आणि शर्यती यांची पण तरफदारी नका करूं ! तुम्हांला सांगून ठेवतों— कुत्र्यावर तुम्ही लिहूं नका. कोणी वाचणार नाही तें. कुत्र्यांच्या छत्र्यांसारखें विपुल व भुक्कड साहित्य थोडें का प्रसिद्ध होत आहे दररोज ?— तुम्ही अगदी कळकळीनें समाजसुधारणेसाठी लिहाल—भुंकत राहाल आणि आपला समाज आहे तसाच चालत राहील ! उपयोग होणार आहे का तुमच्या लेखनाचा ?

आता तुम्हीच जर कांहीशी समर्थांवरच्या, संपादकावरच्या श्वानाची भूमिका घेतलीत, तर निभावेल थोडा वेळ ! पण कृतींचीं आयाळें गळां जडवून साहित्यसिंहाची भूमिका करायचें ठरवलेंत, तर मात्र निभाव नाही हो फार वेळ लागणार !

लेखकमहाराज —कळलं आम्हांला, आपण संपादकाकडे गेला असाल— खपाटीला गेलेलें पोट दाखवलें असेल— चरणात्रपात केला असेल—थोडें लांगूल-चालन—आणि मग त्याने थोडी कृपा केली असेल—म्हणून तर मग हा निबंध लिहायला घेतला नाहीत ?

जाऊं द्या. लिहायचेंच आहे तुमच्या मनांत कुत्र्यावर, तर लिहा बापडे. पण कुत्र्याची स्वामिनिष्ठा आणि इमानदारी साहित्याशीं शेवटपर्यंत दाखवलीत तरी आम्ही म्हणतों पुष्कळ झालें !

(एका हिंदी निबंधाचा आधार)

* * *

९४५५

७

## अश्रु

स्वतःच्या दुःखाला वाट देण्यासाठी अश्रु असतात. दुःखाचे क्वचित् द्रव व दृश्य स्वरूप म्हणजे अश्रु. कांही दुःख मात्र अश्रूंच्याही पलीकडचें असतें. सहानुभूति आणि सांत्वन यांचे प्रतिनिधि म्हणजे अश्रु. नष्ट झालेल्या आवडत्या वस्तूंचा आकर्षकपणा, स्मृतिशेष झालेल्या सुंदर गोष्टी, कालवश झालेली कीर्ति हीं सारीं अश्रूंत उतरतात. निसर्गप्रसव दवबिंदूंची प्रसन्नता, आकाश-गंगेच्या तुषारांचें पावित्र्य, स्वाति-मौक्तिकांचें तेज अश्रूंत सामावलीं आहेत.

असें झालें असतें तर-ही कल्पना अशीच अश्रुपूर्ण आहे. ताटातूट, चिर-वियोग, भूतकालांतील असंख्य घटना अश्रुसिंचित आहेत. जगाच्या कटु अनुभवाने अश्रु बेचव झाले असावेत. भावनाविकारांची उष्णता त्यांच्यांत आली आहे! अश्रु सुखदुःखांचे साक्षीदार आहेत. सुखाच्या अतिरेकांत ते येतात, दुःखाच्या अतिरेकांत ते आटतात. सुखदुःखांचा चक्रनेमिक्रमच त्याने सिद्ध होत नाही काय?

दुसऱ्याचें हृदय विरघळून टाकायला अश्रूसारखें रसायन नाही. निष्पाप अंतःकरणाच्या व्यक्तींच्या अश्रूंत इतकें सामर्थ्य खचित असतें. या गंगायमुनांचें पावित्र्य अमोल आहे. राजकुमाराच्या निष्पाप अश्रूंनी ह्यूबर्टचें हृदय द्रवलें आहे. पण तें अस्वाभाविक वाटत नाही. पतिनिधनाने हृदयाचा कठोर पाषाण झाला— पण मांडीवर तिचें मूल ठेवतांच, चैत्री वादळाप्रमाणे तिच्या डोळ्यांतून अश्रु घळघळले आणि पाषाण नवनीत झाला! अश्रूंनी तिचा प्राण तिला परत दिला! काय, अशक्य वाटतात या गोष्टी ?

सहानुभूति आणि पश्चात्ताप यांसारख्या भावना शेकडो कवनांत गाइल्या, हजारो ग्रंथांत वर्णिल्या, तरी एका खऱ्याखुऱ्या अश्रूने जें काम होईल तें त्यांनी मुळीच होणार नाही. माझ्या ओळखीचे एक गृहस्थ आहेत. नेहमी हसतमुख असत. त्यांच्या डोळयांत मीं कधी आसवें पाहिलीं नाहीत. त्यांचें हास्य आशावादी आहे, उत्साहक आहे, पण त्यांत बेफिकिरी आहे. त्यांच्याजवळ सांत्वन करणारे अश्रु नाहीत. दुसऱ्यावर, निकटवर्ती मित्रावर आपत्ति आली तर हे त्याच्या समाधानाला जात नाहीत. कारण त्यांना ती व्यक्तच करतां येत नाही! या गृहस्थांजवळ कुणी जिवाभावाच्या गोष्टी करीत नाही. कारण समरस होणारें मन त्यांच्याजवळ नाही. स्नेह केवळ हास्यविनोदनाच्या प्रकाशाने वाढत नाही—त्याला अश्रूंचा पाऊसही लागतो.

प्रत्येक जण अश्रूंचा भुकेलेला आहे. हसण्या-खेळण्यास, मौजमजा करण्यास हवे तितके मित्र मिळतात, पण आपल्यासाठी रडणारी एक तरी व्यक्ति मिळेल का, म्हणून प्रत्येक मनुष्य तशी व्यक्ति शोधीत असतो. त्याला आपल्या दुःखाला भागीदार करणारा हवा असतो. आपल्यासाठी कुणी तरी दोन अश्रु गाळावे, असें त्याला वाटतें! मला वाटतें, दुसऱ्याकरिता दुःखी होण्यांत याचमुळे पावित्र्य आलें असावें. दुसऱ्याला थोडें लागलें तरी लहान मुलांच्या डोळयांना पाणी येतें, दुसऱ्याला मार बसला तरी कांही लहान मुलें सहवेदनेने रडतात—असें माझें मन असावें असें मला वाटतें. मला अश्रु लपवायचे नाहीत. बुद्ध-गांधी यांच्या अश्रूंतलें सामर्थ्य मला मिळालें तर हवें आहे. ज्यांनी आजन्मांत दुसऱ्याकरिता अश्रु ढाळले नाहीत त्यांच्यासारखे दुर्भागी तेच! त्यांना मी ते कधीही रडत नाहीत म्हणून शूर, भाग्यवान् म्हणूं काय ?

खरे अश्रु हे निरपेक्ष व व्यापक प्रेमाचे पाझर आहेत. सुखाचें सासर असतांही माहेर सोडून जातांना कन्या रडते. त्यांत जिव्हाळा व काव्य आहे. निराशासंकुल कालांतील अश्रूंत आशा आहे. तपानंतर होणाऱ्या पुनर्मीलनाच्या वेळीं अकस्मात् येणाऱ्या अश्रूंत उत्कट प्रेमाची विशुद्धता आहे ! अश्रु !—सारें भावनाविश्व या लहानशा अश्रुबिंदूंत सामावलें आहे !

* * *

## १०

## पाऊल

माझ्या खोलीला तीन खिडक्या आहेत, परंतु एक खिडकी मात्र अशी खालच्या अंगाला आहे की, तींतून रस्त्यावरून चालणाऱ्या माणसांचीं फक्त पावलेंच दिसतात. रिकामपणचे किती तरी क्षण मीं नुसतीं पावलें पाहण्यांत घालवले आहेत.

चटकन् मला आठवण झाली 'टेल ऑफ टू सिटीज्' मधल्या 'डॉ.' ची. त्याच्या खोलीला असाच एक झरोका होता. त्यांतून रस्त्यावरून जाणाऱ्या लोकांचीं पावलें तेवढीं दिसत. या घटनेचा त्या कादंबरीकाराने कसा उपयोग करून घेतला आहे हें आठवत नाही, परंतु माझें मात्र या पददर्शनाने मनोरंजन भरपूर झालें आहे.

तीं पाहा दोन लालसर चिमुकलीं कोंवळीं पावलें ! कदाचित् पहिल्या-पहिल्यानेच या रस्त्यावर वाटचाल करीत असतील. घुटमळत आहेत, रेंगाळत आहेत, अरेरे ! कुणी तरी ओढतें आहे त्यांना — पण अखेरीस हें पाहा त्यांना कुणीं तरी वर उचलून घेतलें !

आणि ती पाहा दुसरी – तळपायाला लावलेली मेंदी, ती आरुण छटा पातळशा सपातांतून चमकत आहे. रेखीव, गौर, प्रमाणबद्ध अशा पायांनी वरच्या सर्व शरीर-सौष्ठवाची स्पष्ट कल्पना येत आहे मला ! चाल तरी किती संथ आणि उन्मादक. आता मला कळतें की, स्त्रियांच्या चालण्याला हंसीच्या वा गजाच्या गतीची उपमा कां देतात तें ! अशी चाल पाहिली की कुणा कवीच्या ओळी आठवतात — "पथिं चालतीं पडतीं किती तव संथ कोमल पांउलें –" आणि त्या पदन्यासाबरोबर उमटणाऱ्या नूपुरांच्या झंकारांनीं मन नुसतें वेडेंच होत नाहीं, तर त्या पावलांवर रागावतें. म्हणतें —

"अशि कशी धुंद मस्तींत चालशी मुली ?
तुडविशी किती तरुणांचीं तूं हृदयें या पाउलीं !"

आणि तीं पाहा दुसरीं पावलें. दिवसभराच्या कष्टाने दमलीं आहेत. शिणलेली वाट केव्हा व कशी संपेल म्हणून मोठ्या विवंचनेंत आहेत. घरीं जाण्यासाठीं उत्सुक असतील, पण भरभर उचलण्याची शक्ति कुठे आहे त्यांना ? घरीं गेल्यावर तरी त्यांना विश्रांति मिळणार आहे का ? चेपणार आहे का कुणीं तीं ?

हीं कुणाचीं बरं – ? छे, तें का सांगायला हवें ? घटकेंत डावीकडे तर दुसऱ्या क्षणीं उजवीकडे झुलणारीं, हेलकावे खाणारीं – ! दिवसभर कसे तरी श्रम केले. आता दारू पिऊन झिंगून तो घरीं चालला आहे. आता तोल सावरत नाही. इथेच कुठे तरी पडणार तो.

विक्राळ खिळ्यांचे बूट घातलेला कादरखां गेलेला मला दिसतो. फॅशनेबल कट शू घालणारा काळाबाजारवाला ओळखतों मी. सटक-फटक करीत पुणेरी जोडेही जातात इथून. उंच टाचांचे बूट घालून कुणी जातें. केवळ पावलांवरून व चालीवरून मी किती तरी गोष्टी सांगतों. चोराचीं पावलें मला कदाचित् ओळखतां येत नसतील, पण पोलिसाचीं येतात.

कुठल्याही योजनेंत, व्यवहारांत, बांधकामांत सगळ्यांत अधिक महत्त्व पायाला. मानवी व्यवहारांतही पावलांना. श्रीकृष्ण परमात्म्याकडे अर्जुन मदत मागायला गेला, तेव्हा तो त्याच्या पायाच्या बाजूला बसला. पायांवर डोकें टेकण्याहून अधिक नम्रता व शरणागति कशाने व्यक्त होईल ? 'वंदीन

चरण' हीच भक्ताची जास्तींत जास्त अपेक्षा. लक्ष्मणासारख्या सेवकाला सीता-माउलीच्या नूपुरांचीच तेवढी ओळख होती. भरताने रामाच्या पादुकांवर समाधान मानलें !

आधुनिक काळांतही खाविंदचरणारविंदीं मिलिंदायमान होणारे सरकारी नोकर, 'अलुपिष्ठण' साहेबाच्या बुटांच्या मृदुल स्पर्शानें रावबहादूर पदवीला पोहोचूं पाहणारे धेनुवल्लभ खूप आढळतात समाजांत. अडल्यामुळे गाढवाचे पाय धरायला धजणारे 'नारायण' ही बरेच आहेत! अनेक भावनांचा आविष्कार पादवाचक शब्दांनी झाला आहे. वीरपुरुष म्हणत असतो : 'लाथ मारीन तेथे पाणी काढीन !' कर्तबगार स्वतःच्या पायांवर उभा असतो. लाचार हातांपायां पडत असतो—तीन पावलें मागणारा वामन—सारे पायांच्या आधाराने बोलतात.

माझ्या खिडकींतून मला मानवसमाजाचें पददर्शन प्रत्यहीं घडतें. यांतील विराटपणा व विविधता मी कल्पनेने जाणूं शकतों ; परंतु मी वाट पाहतों आहें त्या समचरण महात्म्याची — ज्याच्या दर्शनाने आणि स्पर्शाने साऱ्या लोकांचा उद्धार होणार आहे !

★ ★ ★

## ११ सौंदर्यपूजा

प्रीतीसारखें सौंदर्य दुर्मिळ नाही. तें बागांत, शेतांत, बाजारांत सर्वत्र सापडतें आणि हृदयांत तर अधिकच प्रकर्षाने खुलतें. विस्तीर्ण जला-शयाच्या लहरींवर तें नाचतें, श्रावण महिन्यांतल्या पावसाच्या सरींतून संगीत-

रूपाने तें निनादतें, हिरण्यागार वनश्रींत विविध रंगांच्या फुलांतून तें डोलतें, वनितेच्या विलासयुक्त हावभावांत तें भुलवतें. वाङ्मयांत रसरूपाने सुखवतें आणि साऱ्या विश्वांतच चैतन्य निर्माण करतें.

सारें सुंदरच आहे. सुंदरतेला उणीव आहे कशाची ? त्रिपुरी पौर्णिमेला चांदण्यांत फिरायला निघालों होतों. शशांक, शीतलसा समीरण, सभोवतीं सस्यशामला सृष्टि ! न्यून कुठे होतें ? नाही म्हणायला चंद्रावर डाग होता ! पण तें लांछन त्याचें भूषण ठरलें होतें. सौंदर्याचा शोध, त्याची उपसाना यांत अमाप आनंद आहे नाही ? केवळ दोष शोधायची दृष्टि बाळगली तर चंद्राच्या लांछनामुळे मीं त्याचा अव्हेर केला असता. आकाशांतल्या तारका अव्यवस्थित मांडलेल्या आहेत म्हणून मी रागावलों असतों ! जगांत कुरूपतेपेक्षा सौंदर्य नक्कीच अधिक आहे !

सौंदर्य ? — सौंदर्याची व्याख्या करतां येणार नाही आणि तें कुठे आढळेल, कुठे आढळणार नाही, हेंही सांगतां येणार नाही. समुद्राच्या कडेला दृष्टीस पडणाऱ्या एखाद्या लहानशा शिंपलींत तें आहे ; तसेंच तें रत्नाकराच्या तळाशीं असणाऱ्या मूल्यवान् मौक्तिकांत देखील आहे. ओसाड माळरानांत एखाद्या खडकाआड लपलेल्या छोट्याशा निळ्या फुलांत तें असेल. उंच कड्यावरून कोसळणाऱ्या पाण्याच्या प्रपातांखाली सापडलेल्या कुमुदांत तें असेल; सागराच्या नीलिम्यांत, आकाशांतील मेघरंगावलींत, लज्जामूढा तरुणींच्या कपोलांवरील लालींत, बालकांच्या निष्पाप नेत्रयुग्मांत, एकतारीतून निघालेल्या भावपूर्ण स्वरावलींत–कशांत सौंदर्य नाही ? होय, प्रत्येक वस्तूंत सुरेखपणा आहे. सागर सुंदर आहे–त्याच्या शांत स्वरूपांत आणि त्याच्या रुद्र स्वरूपांतही. वाऱ्याची सुखद सायंकाळची मंद झुळुक सुंदर आहेच; पण प्रचंड लाटा निर्माण करणारें त्याचें तांडव, महान् वृक्ष उन्मळून टाकणारा त्याचा आवेश हाहि सुंदर आहे. मात्र मनाने आपण त्याच्यापेक्षाहि उंच जायला हवें. सौंदर्यशोधकाला कांतार, कारागार किंवा कामोद्यान — कशांतहि सौंदर्य सापडतेंच सापडतें.

पुष्कळदा अन्तःसौंदर्य व बाह्यसौंदर्य यांच्या संबंधाचा प्रश्न माझ्यापुढे उभा राहतो. मला हें पटत नाही की, रूपाने सुंदर असलेली वस्तु आंतून मनाने कुरूप असेल कशी ? प्रशान्त सरोवरांत उमललेलें कमळ बाहेरून सुंदर

दिसतें, त्याच्या पाकळया खोलल्या तर आंतील पराग व रंग काय सुंदर नाहीत? हरिणबाळांच्या सुंदर निष्पाप डोळ्यांच्या बाह्य सौंदर्याकडून त्यांच्या काजळकडांच्या आंत डोकावलें तर काय तेथें कपट सापडेल?

पण सर्वच माझ्या मताचीं नाहीत. इंद्रधनुष्याचे रंग — 'एक भास' ते म्हणतात. नागिणीच्या सौंदर्यांतला विखार त्यांना भासतो. त्यांना माझें सांगणें एवढेंच आहे की, बाबांनो, जेवढें सुंदर आहे तेवढें वेचा. बालकवीनें हेंच तर सांगितलें आहे: "सुंदरतेच्या सुमनांवरचे दव चुंबुनि घ्यावें—" सौंदर्याची खुलावट करावी, त्याचा आस्वाद घ्यावा; पण तोहि सौंदर्याला धक्का न लावतां.

बागेंतील फुलें न तोडतां — झाडावरच्या झाडावर ठेवून नाही का त्यांचे रंग, रूप, गंध लुटतां येत? त्या सौंदर्याची मालकी माझ्याकडे असावी, हा स्वार्थी विचार झाला! स्वामित्वकल्पनेंत सौंदर्यपूजकानें विशेष आनंद मानायचें कारण मला तरी पटत नाही. सौंदर्यपूजकानें सौंदर्याला उपयुक्ततावादाची चर्चाहि जोडूं नये, असें माझें स्पष्ट मत आहे. सौंदर्यसेवन निरागस, निर्हेतुक झालें पाहिजे. नाही का?

विचारांच्या तंद्रींत बराच दूर आलों मी. चांदणें कसें पडलें होतें? जणुं विश्वामित्राच्या तपःसामर्थ्याचें तेजच! रस्त्याच्या दोन्ही अंगांना साधारण उंच वृक्षांच्या रांगा होत्या. पलीकडे दूरपर्यंत हिरवेंगार मैदान होतें — आकाशाच्या सीमेवर पर्वत गर्द जांभळे-काळे दिसत होते — उत्तरेकडून येणारा मंद वारा सुखवीत होता. चंद्रकिरणांनी रुपेरी दिसणारे ढग सभोवतालच्या रुपेरी शांततेंत उदात्त, सुंदर दिसत होते. त्या ढगांकडे पाहून वाटलें, ढगांचें हें सौंदर्य नश्वर असेल का? थोड्या काळानंतर ते नष्ट होतील. सौंदर्य वा काळ-कोण जिंकील? काळ सौंदर्य नष्ट करूं शकणार नाही, तें सौंदर्य स्थान-रूप बदलील एवढेंच. कळीचें फूल होईल. फूल नष्ट झालें तर त्यांतील सुगंध वारा नेईल. वारा जललहरींना तो वाटील — जललहरी वनलतांना पुन्हा देईल. पण तें नष्ट होईल कुठे? विश्वाचा जन्म सौंदर्यांत आहे म्हणून सौंदर्य अमर आहे.

माझें फिरणें संपल्यानंतर मी परत फिरलों, तेव्हा सौंदर्याची वारुणी प्यालेलें माझें मन आनंदमय झालें होतें. मात्र त्यांत उन्माद नव्हता, सात्त्विकपणा होता.

* * *

१२

# चंद्राचें आत्मवृत्त

लहानपणीं मी तुला फार आवडत होतों. तुझ्या मामाच्या घरीं जात असें! तूप-रोटी खाऊनहि उपाशी राहात असें! कडूनिंबाच्या झाडाखालीं लपत असें. त्या निंबोण्या—मामाच्या चिरेबंदी घरामागच्या निंबोण्या—करवंदां-सारख्या गोड असत. खरंच, आजोळचें सारें गोड. मामाच्या घरचें सर्वच प्रिय!

लहानपणीं तुम्हांला मी फार प्रिय होतों. लहानपणीं प्रभु रामचंद्राला देखील चंद्र हवा होता!

मी लक्ष्मीचा भाऊ आहें. तिच्यापाठोपाठ समुद्रमंथनांतून वर आलों. परंतु जगांतील लक्ष्मीच्या वांटपांतील विषमता दूर करण्याचें सामर्थ्य माझ्यांत नाही. मी औषधींचा सखा आहें, परंतु माझा स्वतःचा राजयक्ष्मा दूर करण्याचें सामर्थ्य माझ्यांत नाही. मी कलानिधि आहें खरा; परंतु माझें कलापूर्णत्व मला एका दिवसापेक्षां अधिक भोगतां येत नाही.

मी कवींना आणि प्रेमिकांना प्रिय आहें. विरही प्रियजनांना माझा शीतल प्रकाश जाळतो म्हणतात, पण मी त्याला काय करूं? माझें शैत्य त्या श्रीशंकराला—भालचंद्राला आणि चंद्रमौळीला—पटलें आहे म्हणून तर त्याने मला मस्तकीं धारण केलें आहे. मी सुधाकर आहें, परंतु माझा प्रकाश कांहींना मदिरेहून उन्मादक वाटतो.

माझ्या रूपाचा मला गर्व नाही. परंतु माझा गौरव फार झालेला आहे. कवींनी आणि प्रेमिकांनी मुखाला चंद्राची उपमा रूढ केली आहे. कुणीं मला शशांक बनवलें, तर कुणीं मृगलांछन. कुणाला माझ्यावर राजकन्या दिसली आहे, तर कुणाला तेथे दोन गुलाब फुलल्यासारखे वाटले आहेत.

पण खरं सांगूं का? मी विकल आहें, कुरूप आहें. अर्ध्या अंगावर महाभयंकर थंडी आहे किंवा अर्ध्यावर जळून गेलेले ज्वालामुखी आहेत. प्रकाशांतल्या बाबतींतलं हें परावलंबी जिणं जगायचा मला खरोखर कंटाळा आला आहे. आकाशाच्या उजाड माळरानांतून एकटेंच एकटें फिरायचा कंटाळा आला आहे. मला पुष्कळ सत्तावीस राण्या आहेत; परतु कुणाच्याच सहवास मला पुरेसा मिळत नाही. रोहिणीवर माझें विशेष प्रेम आहे ही गोष्ट खरी; परंतु—

मित्रा, या निळ्या सागरांतून एकट्याची ही जीवननौका नेतांना मला उत्साह कसा तो वाटतच नाही. तो सागर माझ्यासाठी उफाळतो आहे, उसळ्या घेतो आहे; परंतु मी त्याला पुन्हा भेटूं शकत नाही! तो माझा जन्मदाता आहे.

माझा भाऊ महापराक्रमी सूर्य. एका घरांत आम्ही राहतों; परंतु एकमेकांची गाठ कधी अवसेला पडेल तेव्हा! आम्ही दोघे ईश्वराचे नेत्र आहों म्हणे! ‘चन्द्रमा मनसो जातः’ म्हणून ऋषींनी माझा गौरवहि केला आहे. परंतु माझ्या मनचीं दुःखें मात्र ‘यावच्चन्द्रदिवाकरौ’ अशींच मला भोगावीं लागणार, यांत शंका दिसत नाही.

कंटाळा आला का तुला माझ्या रडगाण्याचा? तसा मी फार सुखी आहें. कारण माझ्या स्वतःच्या दुःखांचा विचार दूर ठेवून इतरांना सुखी करण्याचा माझा प्रयत्न आहे. सहोदर बंधु नसलेल्या अनेक भगिनींना मी नाही का सुख देत? प्रतिपदेची आणि बीजेची कोर आकाशाच्या कडेला छान दिसते आणि रमणींच्या भालप्रदेशावरही ती खुलते. ‘चौथीचा चांद’, ‘रामाच्या बागेमधला चंद्र चवथीचा’ अपौरुषय वाङ्मयांत अमर झाला आहे. अष्टमीचा चंद्र सुंदरींच्या निटिलप्रदेशाची एकमेव उपमा होऊन बसला आहे. आणि पूर्णचंद्र! — आजपर्यंत माझ्या या रूपदर्शनाने कित्येकांना वेड लावलें आहे!

माझ्या उदास जीवनांत विशेष रम्यता कधी कुणी आणीत असेल तर तीं लहान मुलें. त्यांचा मी चंदामामा आहें. जोंवर जगांत अनेक बहिणींना मी त्यांच्या ‘भावाची सय’ करून देतों आहें, जोंवर लहान बाळें माझ्यावर निरपेक्ष प्रेम करीत आहेत, तोंवर मी खूप सुखी आहें. मोठ्या माणसांकडून मी प्रेम वा प्रशंसेची मुळी अपेक्षाच करीत नाही. ती कधी माझ्या दर्शनासाठी तिष्ठत बसतील तर माझ्या दर्शनाने चोरीचा आळ येईल या भयाने मला टाळूं पाहतील!

मी फार बोललों का ? मला की नाही स्वतःशीं बोलण्याची फार संवय आहे. स्वतःच्या सुखदुःखांच्या गोष्टी मी करूं तरी कुणाजवळ ? आता खूप उशीर झाला. जा झोपा हं. त्या पाहा वेली निजल्या. धरित्री शांत झाली. वारे निमाले. जागरणाने डोळे शिणले.

मला झोप ? छे—विश्वाला हें चंदेरी पांघरूण घालून मला पहारा करावासा वाटतो. आपल्या मायेच्या पंखांखाली घेतलेल्या पिलांकडे पक्षिणी किंवा कुशींत शिरून झोपलेल्या बाळांकडे पाहून माउली जशी संतुष्ट होते, तशी तुष्टि या विश्वाकडे पाहून मला होते.

तो पहा कुठूनसा कोंबडा आरवला. त्याने मला जणु इशारा दिला, "तुझें चंद्रराया सरे राज्य आता—" माझ्या जाण्याची वेळ झाली. उद्या भेटूं आपण. पण उद्या याच वेळेवर मी येईन असें नाही. कांही दिवस मी उशीरा येतों. कांही वेळा मी लवकरहि येतों. तसंच म्हटलं तर माझ्या अनियमितपणांतहि नियमितपणा आहे. पण जाऊं द्या तें.

यमुनेच्या काळ्याभोर पाण्यांतलें माझें सुंदर प्रतिबिंब इतका वेळ रमणीच्या मुक्त केशसंभारांत गुंफलेल्या श्वेत कमलाप्रमाणे दिसत होतें, पण तें आतां फिकट होत चाललें ! या पांडुरतेनें माझें लांछन अधिक स्पष्ट झालें. मी माझ्या गुरु-पत्नीशीं केलेल्या व्यभिचाराचें हें लांछन. अनेक दुष्कृत्यांचें हें गालबोट मला निराश करतें. असें वाटतें, दूर कुठे तरी निघून जावें.

पण माझ्या वसुंधरेचा मोह मला सुटत नाही. तिच्याभोवतीं मी फिरतों आहें. मला झोंप नाही, विश्रांति नाही.

जड झालेल्या पापण्या मिटायला लागल्या. गगनांतले रत्नदीप विझूं लागले. माझी जायची वेळ झाली. फांदी-फांदीवर किलबिलाट सुरू झाले. गोठ्या-गोठ्यांत वत्सांचे हुंकार सुरू झाले. घराघरांत पाळणे कुरकुरले. मला किनई बोलण्याचा मुळीच कंटाळा नाही. बोलायचं खूप आहे मला; परंतु आता पुरे —केव्हा तरी येईन अशींच चंदेरी स्वप्नें घेऊन पुन्हा !

★ ★ ★

१३

# आकाश

मी आजारी होतों; अगदी अंथरुणावर निजून राहावें लागलें होतें आठ-एक दिवस. आणि मला आठवतें की, आजारीपणांतलें एकहि सुख मला लाभलें नव्हतें. मी एकटाच होतों. पहिले चारपांच दिवस शेजारच्या लोकांनी चौकशी पण क्वचितच केली. मुंबईतला बेफिकिरी शेजार होता तो. सकाळीं रामाने मुसुंबीं आणून द्यावीं, डॉक्टरकडून औषध आणावें, कपडे बदलावे आणि अंथरूण साफसूफ करून जावें. सकाळीं ९च्या सुमारास कपडे धुऊन दांडीवर टाकले की तो जाई. दुपारीं कुठला पुन्हा यायला बसलाय् तो ! रजा तर घ्यायला लागली होती. अंगांत उठून बसण्याची देखील ताकद नव्हती. घरीं पत्र लिहिण्याचें मी टाळीत होतों; पण नंतर आठ दिवसांनी लिहिलें पत्र कसेंबसें !

पण तो रुग्ण-सप्ताह माझ्या चांगल्या प्रकारें आठवणींत राहिला आहे. अगदी अंथरुणावर पडून राहावें लागल्याने सारा वेळ झोपेंत वा मननांत घालवला जाई. झोपेंत मीं नाना प्रकारचीं स्वप्नें पाहिलीं. कित्येक मीं स्वतः रचिलीं होतीं. आणि मननांत तर किती विषयांची हजेरी झाली, हें सांगतांहि येणार नाही. त्यांतल्या त्यांत उशालगतच्या खिडकींतून जेव्हा मी बाहेर पाहीं, तेव्हा हरघडीं मला तेथें नवें दृश्य दिसे आणि मग नव्या कल्पना सुचत.

रात्रीच्या वेळीं खिडकींतून दिसणारें तें छोटें आकाश तारकांनी ठिच्चून भरलेलें दिसे.त्या आजारीपणांत माझ्या दहा मिनिटांच्या झोपेंत माझ्या मनाला हजारो सुखकर स्वप्नें दिसावींत, तसे ते तारे मजेदार दिसत. त्या चिमुकल्या चौकोनी आकाशांत ती देवाघरची चमकती दौलत आपल्या विशालपणाची

कल्पना देई. आकाश अनंत होतें, पण त्यांतला तो चौकोनी तुकडाच मला पाहायला मिळत होता. त्या चौकटीला डावीकडून तिरकसपणें छेदून चंद्र जाई.

चंद्राचें कौतुक आता कवींनी इतकें करून ठेवलें आहे — पण या चंद्राचा मला मात्र राग येई. चंद्राच्या आगमनाबरोबर कित्येक तारकांचें तेज फिकें पडे. चंद्र असला म्हणजे त्या खिडकींत एकाहि ताऱ्याला डोकावतां येत नसे. चंद्र आकाशांतील ताऱ्यांचें, नक्षत्रांचें तेज पितो आणि गबर होतो. परप्रकाशी चंद्र अशा प्रकाराने तारांचें पिधान करतो, ही कल्पना आल्याने चंद्राचा मला राग येई. खिडकीच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत जायला त्याला दोन तास लागत. अर्थात् दर दोन तासांनीं रात्रीच्या त्या दहा तासांत माझ्या खिडकींतील ताऱ्यांच्या मांडणींत पांच वेळां तरी बदल होई. सुरुवातीला कडेला असलेला तारा पुढे सरकला की पंधरावीस मिनिटांत तेथे दुसरा एखादा तारा चमकूं लागे. आकाशाचें मर्यादित अनंतत्व माझ्या खिडकींत मी पाहत होतों आणि त्या अनंतत्वाच्या गतीची मला कल्पनाहि येत होती.

आणि कधी माझ्या या आकाशाचे कंगोरे ढगाळून जात. अंधार—अंधार कोंडून राही सर्वत्र. दरिद्री माणसाच्या मनांत निराशा भरावी, तितक्या सहजतेने अंधार भरारा जमे. एखाद्या दुष्ट माणसाच्या मनांत अनेक दुष्ट कृत्यांच्या कल्पनांनी थैमान घालावें, तशा प्रकारें ते थैमान घालीत. बेशिस्त-पणाने ते वागत आणि त्या ढगांत संघर्ष उडे! त्यांच्यामधून वीज चमकून जाई आणि दचकून ते बाजूला होत. आणि कुणी तरी क्षणार्धांत ते सारे ढग पिळून काढी. त्यांतील पाणी निपटून टाकलें जाई आणि ते पांढरे-फटक पडत, अदृश्य होऊं लागत. जीवनसर्वस्वाच्या दानामुळे शुभ्रधवल यश आणि मुक्ति दोन्ही त्यांना प्राप्त होई.

अगदी आळसावून संध्याकाळच्या वेळीं मी आकाशाकडे पाहीं तेव्हा निरा-मय नीलिम्यापलीकडे तेथे कांही नसे. पण त्या निळेपणांत नावीन्य असे, उत्साह असे. आकाशाचा तो नितळपणा मोठा पवित्र भासे. माझ्या खिडकीं-तून निव्वळ आकाशच दिसे. तेथून उंच देवळांचीं सोनेरी शिखरें आणि वृक्ष-राजांचीं उन्नत मस्तकें व पर्वतांचे कडे...वगैरे मानव आणि निसर्गनिर्मित कांहीच दिसत नसे, त्यामुळें आकाश म्हणजे फक्त आकाश दिसे. असें जरी

होतें तरी तेथे सौंदर्य आणि विविधतेची कमतरता कधीच भासली नाही. आकाश ही परमेश्वराची पहिली कृति असली पाहिजे आणि त्यांतील पहिलेपणा अद्यापि अवीट आणि ताजा राहिलेला होता, हें मीच प्रत्यहीं पाहात होतों.

आकाश ही परमेश्वराची पहिली कृति असल्यामुळे ती जरा चंचल आहे, अस्थिर आहे. प्रत्येक क्षणाला आकाशाने आपले रंग बदललेले दिसतात. तुरळक ताऱ्यांचें चांदणें आकाशभर पहाटे पाहावें तर कांहीं क्षणांनी केशरी, पिवळ्या, लाल, नारिंगी रंगांची उधळपट्टी करीत सूर्य येतो. हें सोनें उधळून होतें न होतें तोंच तें पांढरें स्वच्छ रुपेरी रूप घेतें.

ऐन दुपारीं रुप्याचा रस सळसळत असतो. संध्याकाळ होते आणि रजनी आपल्या केशपाशाचा संभार सावरीत, काळ्या चंद्रकळेंत येते. वर्षाऋतूंतील ढगांची शोभा कांही वेगळीच. प्रमत्त मयूरांच्या पिसाऱ्याप्रमाणे ते घन कृष्ण असतात. शारदीय ढगांची शोभा त्याहून निराळी. भर्तृहरीने ज्या दुःखद गोष्टी सांगितल्या, त्यांतील मदक्षीण हत्तींची किंवा रतिश्रान्ता विलासिनींची उपमा द्यावीशी वाटते मला त्यांना.

क्वचित् या ढगांवर इंद्रधनुष्याचा एक खंड दिसतो. या ढगांवर हळुवार हाताने कुणीं कुसुंबी रंगाचा शिडकावा केलेला असतो आणि कधी पिंजून टाकलेल्या कापसाच्या पुंजक्यासारखे आणि कधी राजहंसाच्या गळलेल्या एखाददुसऱ्या पिसासारखे, आणि कधी अफाट सागरांतील एकट्यादुकट्या शिडेच्या नौकेसारखे ढग संचारतांना दिसत. पित्याचे बहुतेक गुण त्यांच्यांत उतरले होते. नित्य, सर्वगत, स्थाणु, अचल, सनातन असे ते खात्रीने होते. सुख-दुःखांचे ढग येत–जात; पण तें निर्लेप राही. अच्छेद्यादि आत्म्याचीं सर्व लक्षणें त्याला लागू पडत. आणि खरेंच होतें तें. रस्किनने एके ठिकाणीं म्हटलें आहे की, परमेश्वराचें आस्तित्व विध्वंसक ज्वालामुखींत नाही, भूकंपांत नाही; तें शांत प्रवृत्तींत आहे. मी म्हणतों, अधिकतर तें आकाशांत आहे.

एवढेंच की, आकाशाचें असें भव्य, विराटस्वरूपी दर्शन आपण क्वचितच घेतलें आहे. आकाशाच्या अनंतत्वांत खगोलशास्त्रज्ञांनी व ज्योतिःशास्त्र्यांनी मनाने वा दृष्टीने आजवर अनेकदां अवगाहनें केलीं असतील. इतकेंच नव्हे तर



ठाणे. स्थळप्रत.
22.755 दि. 1.8.6...
क्रमांक 7700 नों: दि: 27/10/50

आतां आधुनिकांनी आकाशांत खूप फेऱ्या घातल्या असतील; आकाश भेदून चंद्र-मंगळांवर जाण्याचे संकल्पहि रचले असतील. पण आकाशाचें काव्यमय ऐश्वर्य, आनंदमय वैभव व त्याचें ईश्वराशीं सादृश्य किती जणांनी अनुभवलें आहे?

मीं आकाशाला अनंत, शाश्वत, निर्लेप म्हटलें खरें; पण चुकलेंच तें जरासें!

आकाशांत रंगसौंदर्याबरोबर संगीताचीहि लयलूट असते. आकाश म्हणजे शब्द असें वेदान्त सांगतो. नादब्रह्माचा साक्षात् आविष्कार आकाशांतच होतो. उगाच नाही मंजुळ शब्द करीत पक्षी आकाशांत उड्डाण करीत. खिडकींत सकाळ-संध्याकाळ मी पाहातें: पक्ष्यांचीं जोडपीं एकमेकांना प्रेमाची साद देत तरंगत जातात. त्यांच्या प्रीतीचे अनमोल अशरीरी सूर मी ऐकतें. वाऱ्याचा घोंघाव, मेघांची गर्जना आणि विद्युल्लतेचें वर्षासंगीत ऐकलें आहे मीं! आकाशापासून पृथ्वीपर्यंत रुपेरी पावसाच्या धारा—नव्हे वीणेच्या तारा—संगीत स्रवत असतात. उषासूक्ताचें लयबद्ध प्रेमगीत दररोज सकाळीं मीं ऐकलें आहे!

परंतु कधीमधी आकाशाचें भव्योग्र दर्शनहि मला झालें आहे. क्षणैक मला भीति वाटली आहे त्या वेळीं; परंतु आकाशाची ही भव्योग्रता हा त्याचा स्थायीभाव नव्हे. आईबापांच्या रागासारखें आहे हें. ते रागावले तरी क्षणभर, पुन्हा त्यांचें अंतःकरण निरागस, निर्मलच दिसतें. आकाशाचें तसेंच आहे!

त्या आठ दिवसांत मी आजारी होतें त्या वेळीं आकाशाची सोबत झाली मला. सावरकर विजापूरच्या कैदेंत एकांत कोठडींत असतांना त्यांना वरच्या धुराड्यांतून आकाशाचा कांही भाग तेवढा दिसे. ती सोबत त्यांना कशी वाटली असेल, त्याची मला या वेळीं कल्पना आली. तळघरांतील निराकाश खोल्यांतील कैद्यांचीं दुःखेंहि मनांत येऊन गेलीं. खरेंच, ईश्वराच्या सोबतीसारखी आकाशाची सोबत वाटली मला. या आकाशांत दिसणारे चंद्रसूर्य माझ्या दूरच्या गांवांतील घरीं असणाऱ्या माझ्या प्रिय व्यक्तींवरहि प्रकाशित होत असतील, या कल्पनेने आकाशानेच त्या व्यक्ति माझ्या मनाजवळ आणल्या आणि निराशेचीं पटलें दूर केलीं, दुःखें सुसह्य केलीं, आणि आशेच्या अनंत दीपांचीं मनाच्या अन्तकाशांत प्रतिबिंबें पाडलीं!

* * *

१४

# वर्षप्रतिपदेच्या निमित्तानें

आमचा वर्षारंभ कडुनिंबाच्या कडूपणाने होतो. आधी कडु मग गोड, हा आमचा शिरस्ता आहे. वर्षाच्या शेवटीं तिळगूळ आहे, होलिकोत्सव आहे, रंगपंचमी आहे. तिळगुळाचा गोडवा आणि रंगपंचमीची रंगत वर्षाच्या शेवटीं आहेत. वर्षाच्या प्रारंभीं मात्र कडुनिंब — आपल्या वर्षाची सुरुवात श्रीरामाने केली आहे व वर्षाचा शेवट श्रीकृष्णाच्या रासक्रीडेने! आपल्या संस्कृतीचीं हीं दोन टोकें आहेत.

श्रीराम हा दुष्टसंहारक आहे, दक्षिणावर्तातील संस्कृतीचा प्रणेता आहे — भारतीय संस्कृतीचा आदर्शपुरुष आहे. आपलें जीवन राममय करण्याचा आपला प्रयत्न आहे. काळांत रामप्रहर आहे, फळांत रामफळ आहे, जीवनांत राम आहे, जीवनान्तीं रामनाम हवें आहे, भेटीच्या प्रारंभीं रामराम हवा आहे! कौटुंबिक जीवनांतही मुलांना आज्ञाधारकपणा शिकवण्यासाठी दाशरथी राम आहे, बंधुबंधूंचा आदर्श म्हणजे भरताग्रज व सौमित्रिवत्सल राम आहे. आदर्श पतीच्या स्वरूपांत जानकीजीवन राम आहे. आदर्श प्रभु म्हणून भक्तांचा हनुमंतप्रभु श्रीरामसमर्थ आहे. संस्कृतिसंस्थापक म्हणून, अनार्य व आर्य संस्कृतींत पूल बांधणारा सेतुकर्ता राम आदर्श आहे, दानशूरांचा बिभीषण_ श्रीदः हाच श्रीराम आदर्श आहे — आदर्श राज्यव्यवस्था निर्माण करणारा रामाशिवाय कोण आहे?

वर्षप्रतिपदा म्हणजे रामाची स्मृति, आम्हां महाराष्ट्रीयांना तर राम अधिकच प्रिय. रामाच्या अश्वमेधाचा घोडा अंग-वंग कलिंग इत्यादि प्रदेशांत हिंडला असेल; परंतु श्रीरामाचा प्रत्यक्ष संसर या महाराष्ट्रांत झाला आहे, गोदा-

तटाकीं झाला आहे. जानकीसाठी शोध करीत आणि शोक करीत रामानें लतावृक्षांना, दगडधोंड्यांना विचारलें असेल. सीतेचा कांचनमृग इथे वावरला आहे. सीतेचीं अंगभूषणें या प्रदेशांत जागोजाग पडलीं, रामाचे अश्रु याच प्रदेशांत जागोजाग ढाळले गेले. याच भागांत भक्तश्रेष्ठ भोळी भिल्लीण रामासाठीं उष्टीं बोरें घेऊन रामाची वाट पाहात हिंडली असेल !

श्रीरामाचे महाराष्ट्रावर अनंत उपकार आहेत. 'जय जय रघुवीर समर्थ' अशा आरोळ्यांनी येथील फत्तर अन् फत्तर जागा झाला आहे. रणकर्कश व धनुर्धारी रामानें आम्हांला क्षात्रतेज दिलें आहे. 'राम'दासांनी आम्हांला कर्मयोगाचा व चळवळीचा आदेश दिला आहे.

महाराष्ट्र हा संयमधन लोकांचा देश आहे व मर्यादापुरुषोत्तम राम हें त्याचें आदर्श दैवत आहे. राम हा मर्यादित हिंसा करणारा —एकबाणी आहे. एकवीस वेळां पृथ्वी निःक्षत्रिय करणाऱ्या उग्र परशुरामासारखा नाही किंवा 'न धरीं शस्त्र करीं मी' अशी शपथ घेणाऱ्या कृष्णासारखा नाही. दुष्टनिर्दालनासाठी त्यानें जरूर तेवढीच हिंसा केली. राम हा सत्यप्रतिज्ञ आहे. राम हा एकपत्नी आहे. श्रीकृष्णाचा विलास इथे श्रीरामचरित्रांत नाही. श्रीबालाजी व डाकोरनाथजींचें वैभव इथे नाही. तसेंच अरण्येश्वर, ओंकारेश्वर असल्या शिवालयातील एकांताचा भकासपणा रामाजवळ नाही. राम करुणाघन आहे. राम हा शांत, दान्त, उदात्त देव आहे. रामाचें जीवनच करुण आहे. रामाचा पराक्रम देखील करुण आहे. रामवनवास — सीतेचा वनवास—सीताहरण — सीतेसाठीं शोक — सीताशुद्धि — अशोकवननिवास —सीतेचा पुनरपि त्याग. एकेक प्रकरण म्हणजे एकेक अश्रुकुंभ आहे. दशरथाने पुत्रशोकाने ढाळलेले मरणान्तिक अश्रु, रामाच्या राज्यारोहणप्रसंगीं कौसल्येने रामास केलेला अश्रूंचा अभिषेक, शोकविव्हल सीतेचा अशोकवनांतील शोक — सीतात्याग करीत असतांना लक्ष्मणाने ढाळलेलीं आसवें — पण या साऱ्या अश्रूंमुळे रामायणांत एक तेजस्विता निर्माण झाली आहे व त्यामुळे रामायण सर्वांच्या हृदयापर्यंत जाऊन पोहोचलें आहे.

त्या रामासाठी आज गुढ्यातोरणें, त्या रामाच्या राज्याचा आज प्रारंभ-दिन. पाडवा हा तसा धार्मिक सण नव्हे. गुढीची पूजा गौण असावी. मुख्य स्मरण रामाचें. गुढ्या- पताका तोरणें हीं प्रतीकें, हीं आभरणें, हीं सौंदर्याचीं

साधनें. गुढी कांही दैवत नाही, पण आपण दैवतांबरोबर, पूज्याबरोबर, पूजासाहित्याचीही पूजा करायला शिकलों आहों. आपण कलश, शंख, घंटा आणि पूजासाहित्य यांचीही पूजा करतों, त्यांतलाच हा प्रकार! या सणाला धार्मिकतेचें अवडंबर नाही. सरस्वती, शारदा, लक्ष्मी, ऋषि, गुरु, शस्त्र यांच्या पूजनासाठी निराळे निराळे दिवस निश्चित करून ठेवलेच आहेत. हा दिवस रामराज्यदिन आहे — हाच आपल्या राजकीय महोत्सवाचा दिवस व्हावा!

प्रभु रामचंद्राच्या राजकारणाचा वारसा महाराष्ट्राकडेच अधिक आहे. विस्तृतपणें रामोपासना महाराष्ट्रांतच अधिक आहे. बंगाल्यांत दुर्गा, गुर्जर-मारवाडांत बालाजी किंवा एकलिंगजी, मध्यप्रांतांत महानुभावीयांचा श्रीकृष्ण किंवा दत्तात्रेय, कर्नाटकांत विठ्ठल, मद्रास-तंजावरकडे स्कंद - कार्तिकेय — परंतु आम्हांला आमचा काळा राम प्रिय आहे—कबीरासाठी शेले विणणारा राम प्रिय आहे. रामदास्याची दीक्षा आम्हीं रामदासांपासून घेतली. रामभक्त मोरोपंतांनी १०० वेळां रामकथा शब्दसाखरेंत घोळली — श्रीरामाचा त्रयोदशाक्षरी मंत्र आम्हीं मृत्युंजयमंत्र म्हणून जपला म्हणूनच आम्ही दगडासारख्या थंड गोळ्यांतून सजीव राष्ट्र उभें करूं शकलों. शिळेंतून शापमुक्त अहल्या उभी राहिली! ज्या राममुद्रेंत दगड तारण्याचें बळ आहे, त्या समर्थ रघुवीराचे आम्ही दास, सेवक आहों! या वर्षप्रतिपदेच्या निमित्तानें आपण म्हणूं या, "पुढें वैखरीं राम आधीं वदावा!"

* * *

१५

# अफवा

पुष्कळ वेळां असं होतं की, कुणी तरी आपल्याडे येतो आणि कांही तरी सांगून जातो. प्रथम आपण त्याबद्दल फारशी फिकीर बाळगीत नाही; परंतु पुन्हा तीच बातमी कानांवर येते आणि पुन्हा एकदा येते - आणि मग त्यांत अर्थ वाटूं लागतो. गांवांत अमक्या ठिकाणीं लता मंगेशकरचं गाणं आहे, अशी कुणी तरी गप्प उठवतं आणि चार-सहा तासांत सर्वत्र मोठा धुमाकूळ माजून जातो !

नदीचें मूळ आणि ऋषीचें कूळ शोधूं नये म्हणतात.कारण तें शोधूं गेल्यास सापडत नाही. अफवांचेंही तसेंच आहे. अफवा नेहमीच मध्यस्थस्वरूप असतात. त्या अ-संभव असतात, त्यांच्या मातापित्यांचा पत्ता नसतो. "मला ती शामरावांनी सांगितली." असं रामभाऊ सांगतात. तेवढ्या आधारावर शामरावांना विचारायला जावें तर ते म्हणतात, "मला सदूभाऊ म्हणाले." सदूभाऊ आणखी कुणाचं तर नांव सांगतात आणि त्या गृहस्थांना भेटलं तर ते म्हणतात, "कोणीं सांगितलं लक्षांत नाही बुवा — पण मार्केट-मध्ये कुणीतरी बोलत होतं खरं — !" अफवेचं पितृत्व स्वीकारायला सहसा कुणी तयार होत नाही !

एकदा कांहीं वर्षांपूर्वी मंगळावरील लोक पृथ्वीवर हल्ला करणार अशी अफवा उठली. अमेरिकेंतील ही गोष्ट आहे. कित्येक घाबरून गेले. रेडिओ लावून बसले. वृत्तपत्रांकडे चौकशा होऊं लागल्या. बऱ्याच लोकांनी आपली संपत्ति सुरक्षित ठिकाणीं ठेवण्यासाठी धाव घेतली. पोलिस व सैनिक यांची गर्दी उडाली. जो तो दुसऱ्याला हीच बातमी सांगूं लागला. या बातमीचा इन्कार करूनही

कुणालाही स्वस्थता प्राप्त झाली नाही. मागे एकदा पुण्याला असेंच झालें. खडकवासला व कात्रज धरणें फुटून सर्व पुणें वाहून जाणार अशी गप्प उठली आणि कित्येक वृद्ध पेन्शनर पर्वतीवर जाऊन बसले म्हणे ! युद्धाच्या कथा जशा रम्य असतात, तशीच असंख्य प्रकारच्या अफवांना रम्यता असते. युद्धकथे-बरोबर अफवांनाही मनोरंजकता प्राप्त होते.

अफवांना कल्पकतेची पार्श्वभूमि नेहमीच लागते. त्यांतल्या त्यांत भीषण, बीभत्स व क्रौर्यपूर्ण अफवांचा फैलाव फार लवकर होतो. हिंदु-मुसलमानांच्या दंग्यांत आपणांस याचा अनुभव आला आहे.

व्यक्तीच्या सुप्त भावनांशीं अफवांचा निकट संबंध आहे. पाकिस्तानी सैनिकांनी काश्मिरांत केलेले अत्याचार आणि त्यांतल्या त्यांत स्त्रियांची छळणूक यांमध्ये तत्संबंधी बोलणाऱ्या वा लिहिणाऱ्या लोकांनी सत्य प्रकाश पडताळून पाहाण्याऐवजी अफवांवर अधिक भिस्त ठेवली होती आणि तें स्वाभाविकही होतें.

अफवांचा आवडता विषय म्हणजे अनैतिक वर्तन आणि त्यांतल्या त्यांत प्रेमप्रकरणें ! "गोपाळराव वरून मोठा कर्मठ दिसतो. पण आचरणाने तो तितकासा चांगला नाही. परवाच त्याला मीं ××× ठिकाणीं पाहिलें !" अशी गप्प चटकन् उडवून देतां येते आणि तशी ती पसरतेही ! "शेजारची बेबी आणि तो कॉलेजमधला बाळू यांचं अलीकडे बरंच सूत जमलं आहे" असं जर रमाबाईंनी सीताबाईंना सांगितलं, तर त्यांचा तर बिनशोभाट विश्वास त्या गोष्टीवर बसेलच, पण ही बातमी त्या शक्य तितक्या लवकर त्यांच्या जिवलग मैत्रिणीला सांगण्यांत एक क्षणहि वाया घालवणार नाहीत. खऱ्या-खोट्या अफवा पसरून अर्थातच बऱ्याच वेळीं नुकसानच अधिक होतं, असा सामान्य अनुभव आहे. परंतु या अफवांबाबत विशेष अभ्यास करून आणि त्यांचं एक पद्धतशीर शास्त्र बनवून त्याचा राजकारणांत किंवा व्यापारांत चांगला उपयोग करून घेणं शक्य आहे. विशेषतः जें राजकारण भयावर आधारलेलें आहे, जें हुकूमशाही पद्धतीने चालणारें आहे, त्या ठिकाणीं अफवांचा तोंडी प्रचाराचें प्रभावी साधन म्हणून चांगला उपयोग करून घेतां येतो. हिटलरचा प्रचारमंत्री गोबेल्स याने अशा कर्णोपकर्णी प्रचाराचा उत्तम नमुनाच तयार केला होता. भूमिगतांनाही या प्रचाराच्या द्वारा चांगला पाठिंबा

मिळवितां येतो, असा अनुभव आहे. ज्या ठिकाणीं पुष्कळ माणसें जमतात, अशा जागा–वाचनालयें, सभा, उपवनें, नाट्यगृहें हीं ठिकाणें–कोणत्याही प्रकारची अफवा उठविण्यास योग्य मानल्या जातात. अलीकडे वृत्तपत्रांची मदत या कामीं चांगली होऊं लागली आहे.

अमेरिकेंत एका कारखान्यांत तेथील मालकाने आपला माल शक्य तेवढ्या लवकर विकला जावा म्हणून कंड्या उठविणारे पगारी प्रचारक नेमले होते. ते लोक आगगाडींत, बस किंवा ट्रामसाठी उभ्या असलेल्या माणसांच्या रांगेंत किंवा कॉफी-हाउसेसमध्यें प्रवेश करीत आणि कारखान्यांतील मालासंबंधाने औपचारिक संभाषणास प्रारंभ करून तो महाग होणार, गडप होणार आहे, असें भासवीत. या प्रचारकांपासून कारखान्यांचा फायदा झाला असें सिद्ध झालें आहे. जाहिरात देण्याने जेवढा फायदा झाला असता, त्याच्या किती तरी पट फायदा अशा पगारी संभाषणपटु विक्रेत्यांनी केवळ मानसशास्त्रीय अभ्यासामुळे घडवून आणला.

एखादी अफवा एखाद्या व्यक्तीबद्दल पिकविण्यांत आली, तर तिचा इन्कार करणें हें अधिक जिकिरीचें आणि कष्टाचें काम आहे. अफवा कुठपर्यंत पसरली असेल, तिचा परिणाम कोणकोणत्या व्यक्तींवर कसकसा झाला असेल, यासंबंधीचा अंदाज करणें अत्यंत दुरापास्त असतें. वृत्तपत्रांत जाहीर इन्कार करून देखील लोक इन्कार न वाचतां मूळची कंडी मात्र खरी मानीतच राहतात. किंबहुना त्या व्यक्तीने इन्कार केला, याचा अर्थच मुळांत पसरलेली कंडी खरी होती, असें गृहीत धरलें जातें. अफवांचें खरें-खोटेंपण सिद्ध करणें त्या व्यक्तीला नेहमी शक्य असतंच असं नाही. निकटवर्ती मित्र किंवा नातलग यांच्याजवळ देखील त्याला पुरेसा खुलासा करतां येत नाही. एवढंच काय, पण कधी कधी आपल्याबद्दल गावांत कांही कंड्या उठल्या जात आहेत, अशी सुद्धा कल्पना एखाद्याला असणं शक्य नाही. अर्थात् अफवा आपल्या मरणाने मरूं देणं हेंच जास्त शहाणपणाचं आहे.

अफवा किती काळपर्यंत जगतील किंवा किती व्यक्तींच्याजवळ त्यांचीं आवर्तनें होतील, याचाहि अंदाज करणं कठीण आहे. फार तर एवढं म्हणतां येईल की, कंडीला कारण झालेल्या व्यक्तीच्या माहात्म्यावर तें अवलंबून राहील.

गांधीजींनी उपोषणांत भरपूर ग्लूकोजमिश्रित पाणी घेतलं, या अफवेचा पुनरुच्चार चर्चिलसाहेबांनीं आपल्या एका ग्रंथांत केला आहे. जवाहरलाल नेहरूंचे कपडे पॅरिसला धुण्यासाठी जात, ही गप्प अगदी सर्वमान्य होऊन कित्येक वर्षे प्रचारांत राहिली आणि अजूनही अर्धशिक्षित समाज तिच्यावर विश्वास ठेवतोंच. सुभाषचंद्र बोस जिवंत आहेत, ते पेकिंगहून बोलले, ते प्रगट होणार, अशा अफवांचा हिंदी राजकारणांत मधून मधून उपयोग केला गेलाच.

अफवा कशा पसरतात याबाबत अमेरिकेंत एका लहानशा खेडेगावांत प्रयोग करून पाहण्यांत आला. एका रविवारीं सकाळीं सात मित्र एके ठिकाणीं जमले व त्यांनी एक कंडी उठविण्याचें ठरविलें. त्यांनी आपापसांत असा संकेत केला की, दुसऱ्या दिवसापर्यंत सोयीस्कर ठिकाणीं त्यांच्यापैकी प्रत्येकानें फक्त नवीन व्यक्तीला ही उठविलेली बातमी सांगायची आणि ४८ तासांनी पुन्हा एकत्र जमायचं, असा संकेत केला. या प्रयोगाच्या शेवटीं त्यांना असें आढळून आलें की, पसरविलेल्या बातमीचे सुमारें २० निरनिराळे प्रकार निरनिराळ्या प्रकारची भर घालून तयार झाले होते व ती बातमी तेवढ्या वेळांत सुमारे ३०० लोकांना ठाऊक झाली होती. आपल्याकडेहि अशाच प्रकारचा अनुभव येतो. सोन्या मारुतीला घाम फुटला किंवा पाराजवळच्या झाडाच्या बुंध्यांतून दुधाचा प्रवाह वाहूं लागला, कुठल्या तरी बाईला तीन डोळे व शिंगें असलेलें मूल झालें, अशा अनेक तऱ्हेवाईक अफवा अत्यंत वेगाने पसरतात, हें आपण पाहिलें आहे.

अफवा कधीही खरी नसते; तेव्हां कोणती अफवा खरी व कोणती खोटी हा प्रश्नच उद्भवत नाही. क्वचित् प्रसंगीं अफवा सुरू होण्यास आधारापुरतं सत्य लागतं. परंतु तें सत्य व अफवा यांचा संबंध दूध व ताक यांच्याइतका दूरचा असतो. अफवांच्या दुष्परिणामांपासून स्वतःचा बचाव करून घ्यावयाचा असेल तर आपण त्यांवर विश्वास न ठेवणं आणि त्यांच्या इन्काराचाहि प्रयत्न न करणं हा होय. छापील मजकुरावर आपला विश्वास सहज बसतो. रेडिओंतील बातम्या आपण खऱ्या मानतों. परंतु अशा प्रकारें आपणांस ठाऊक होणाऱ्या सर्व बातम्यांचा स्वीकार करतांना आपणांस फार सावधान राहावं लागेल. "असं समजतं, असं कळतं" अशा स्वरूपाच्या बातम्या अधिकृतपणें समजल्याशिवाय

कधीच खऱ्या मानूं नयेत. विशेषतः पक्षनिष्ठ वर्तमानपत्रें वाचतांना आपण विशेष दक्षता बाळगावी. एखाद्या परिचित माणसाबद्दल दुसरा तितकाच परिचित इसम जेव्हा आपणांस कांही अफवेच्या स्वरूपांत बातमी सांगूं लागतो, तेव्हा तिच्यावर विश्वास ठेवण्यापूर्वी आपण दहा वेळां विचार करावा. अफवांबद्दल आपण खुलासा करूं नये, तसाच इतरांजवळ पण मागूं नये.

तेव्हा आता जर कोणी तुम्हांला सांगायाला आलं किंवा म्हणालं, " तुम्हीं ऐकलंत ? तो म्हणे रेस खेळूं लागला आहे. गेल्या शनवारच्या रेस स्पेशलने मुंबईला जातांना मीं त्याला पाहिला " तर त्या बातमीवर आपणांस त्याचा प्रत्यक्ष पडताळा येईपर्यंत विश्वास ठेवायचं कारण नाही. एवढंच नव्हे तर ती बातमी केवळ आपल्याजवळच ठेवायची. तिला पसरूं द्यावयाचें नाही. मोठं कठीण काम आहे हें ! त्यांतल्या त्यांत स्त्रियांना तर हें फारच अवघड ! बातमी पसरविण्याचे तीन प्रकार एका विनोदी लेखकाने सांगितले आहेत: टेलिफोन, टेलिग्राफ व 'टेल् अ वूमन' त्यांच्या कानांवर आलेली कोणतीहि बातमी पसरविण्यास त्या अत्यंत उत्सुक असतात आणि या बाबतींत पुरुषांपेक्षा त्या अधिक वेगानें प्रचाराचें काम करतात. अफवांना बळी पडणाऱ्यांत स्त्रियांचीच संख्या जास्त ! आणि स्त्रियांसंबंधी अफवाहि जास्त !

अफवांसारख्या विषयांत सत्यापेक्षा अतिशयोक्ति किंवा कल्पना यांना असलेलं महत्त्व लक्षांत घेऊन आपण त्यांच्या कधीही आहारीं जाऊं नये किंवा केवळ गंमत म्हणूनही कोणाबद्दल अफवा पसरवूं नयेत.

* * *

१६

# नांवांत काय आहे ?

इंग्रजी महाकवि शेक्स्पिअरने एके ठिकाणीं लिहिलें आहे, ‘ नांवांत काय आहे ? गुलाबाच्या फुलाला गुलाब हें नांव दिलें काय किंवा दुसरें कांही नांव दिलें काय, त्याच्या सुगंधांत काय फरक पडणार आहे ? ’ नांव ही एक व्यवहाराची सोय इतकेंच—

पण नाही असा नाही अनुभव. नांवांत काय आहे हें सुभाषित जेव्हा मीं परवा सहज वाचलें, तेव्हा निराळेच कांही अनुभव मनांत तरळूं लागले आणि कांही निराळेच प्रसंग मनश्चक्षूंसमोर उभे राहिले.

सुभाषित म्हणजे व्यवहारांतील छोटेखानी सत्य. सुभाषित म्हणजे अनेक पिढ्यांना आलेल्या अनुभवांचें सार. त्यांत एक प्रकारची सार्वत्रिकता असते, काळाने त्याला अक्षरताहि आणून दिलेली असते. मधमाशी जसा अनेक फुलांमधला मध एका मोहोळांत साठवते, तसेंच सुभाषितकार करीत असतो. आणि जों जों काळ लोटतो तों तों त्यामधील औषधीपणा जसा वाढत जातो, तशीं जुनी झालेलीं सुभाषितें —छेः चुकलंच ! सुभाषितं जुनीं होतीलच कशीं ? सोनें का जुनें होतें ?

पण हल्लीचा जमानाच बदलला आहे. जुनीं सत्यें आता सत्यें राहिलीं नाहीत. एक साधंच उदाहरण पाहा ना : ‘ यत्र यत्र धूमः तत्र तत्र वह्निः ’— जेथे धूर आहे तेथे विस्तव असायचाच — पण हल्ली अश्रुधूर असतो डबींत भरलेला आणि तेथे वह्नि मात्र नसतो. दिव्याखाली अंधेर म्हणतात आणि आता मात्र तशी स्थिति थोडीच राहिली आहे ? आता वर वर म्हणायचें की, नांवांत काय आहे ? परंतु ‘ नांवांत सारें आहे —’ असा अनुभव आहे.

परवाचीच गोष्ट. शेजारचे बंडूनाना भल्या सकाळीं माझ्याकडे आले आणि मला विचारूं लागले, 'अहो, एखादं छानसं नांव सांगा.' बंडूनानांना मुलगा झाला होता आणि त्या मुलाचें नांव ठेवायचें होतें मीं म्हटलें, 'नांवांत काय आहे? ठेवा, जमदग्नि, लंबोदर, वक्रतुंड, भिकाजी'—पण छेः! हीं का नांवें त्यांना पसंत पडणार?—मीं म्हटलं वहिनींनाच विचार. नवीन येणाऱ्या या अनामिक पाहुण्याचं नांव काय ठेवावं या सुखकर विचारांत त्यांनी खूप तास, दिवस आणि रात्री घालवल्या असतील. नांवें घेणें सोपें असलें तरी नांवें ठेवणें कठीण असावें. माझ्यासारखा त्यांचाही अनुभव असेल. मी बंडूनानांना अनेक देवांचीं नांवें सांगितलीं, वसंत–हेमंत अशीं ऋतूंचीं सांगितलीं, दिलीपकुमार, राजकपूर अशीं नटांचीं सुद्धा सांगितलीं. पण त्यांना एक पसंत पडेल तर शपथ!

आपल्या मुलाचें नांव ठेवायचें—केवढा अवघड प्रसंग वाटला बंडूनानांना! वस्तुतः जें बालक निर्गुण होतें—निदान अज्ञातगुण होतें खास—बालकाला त्याच्या आकारावरून कांहीं नांवें ठेवतां आलीं असतीं; पण नांव कधीं कधीं नांव ठेवणाऱ्या व्यक्तींच्या अपेक्षा व्यक्त करीत असतें. बंडूनानांनी आपल्या आजोबांचें नांव पुन्हा आपल्या मुलाला ठेवलें—त्यांना त्यांचा मुलगा त्यांच्या आजोबांसारखा भाग्यशाली व्हावा अशी इच्छा होती व ती नांव ठेवण्यांत व्यक्त झाली—आणि तुम्ही म्हणतां नांवांत काय आहे?

परवा मधूच्या लग्नांतला प्रसंग असाच. वरात घरीं आली. लक्ष्मीपूजन झालें आणि मधूनें आपल्या पत्नीचें नांव बदलण्याचा हट्ट धरला. मधूच्या पत्नीचें माहेरचें नांव होतें सिंधू. काय वाईट होतें? पण मधूला तें करुण वाटलें, मवाळ वाटलें. त्याला हवें होतें बदलून तें तेजस्विनी किंवा सौदामिनी करून घ्यायला. नांवांत काय आहे, हें त्यालाही पटलें नाही. नांवांत स्वतःची आवड, स्वतःची कल्पना व्यक्त करण्याची प्रत्येकाची धडपड असते. म्हणून तर नवीं नवीं नांवें रोज शोधलीं जात असतात.

आणि तुम्ही म्हणतां नांवांत काय आहे?

नाट्यछटाकार दिवाकरांची एक नाट्यछटा आठवते. रमाबाई रानडे यांच्या मृत्यूचा प्रसंग आहे तो. ही रीघ लागली आहे त्यांच्या अंत्यदर्शनासाठी! ती

का रमाबाईंच्यावर असलेल्या लोभामुळे? त्यांच्या कार्याचा गौरव व्यक्त करण्यासाठी ? नांव सोडा. त्या गर्दीत फलाणे दोन प्रोफेसरही दाखल झाले आहेत — ते कशासाठी? — तेच सांगतात हळूच, ' अहो, — तेवढेंच ज्ञानप्रकाशांत. वृत्तपत्रांत नांव छापून यावें यांत केवढा आनंद आहे ! अहो, गल्लोगल्लीं मंडळें आहेत, संस्था आहेत, कार्य देव जाणे काय करतात ! परतु फलाण्या सेक्रेटरींचं नांव प्रसिद्ध मात्र व्हायला पाहिजे दर चार दिवसांनी पेपरांत. नांवासाठी कोण ही आटापीट ! आणि तुम्ही म्हणतां नांवांत काय आहे ?

अहो, नांवांत काय नाही ? एखाद्या व्यक्तीचें नांव समजलें म्हणजे सर्व कांही समजलें. देवाचें नांव हेंच देवाचा प्रतिनिधि आहे, असें मोरोपंत म्हणतात. हा प्रतिनिधिसुद्धा देवाचें मोक्ष देण्याचें, मनःशांति देण्याचें काम करुन टाकतो आणि म्हणून तर मग देवाला यावेंसें वाटत नसेल, असा संशय मोरोपंतांनी घेतला आहे. रामनामाने समुद्रावर दगड तरंगले आहेत, अहल्या-शिळा उद्धरली आहे, वाल्याचा वाल्मीकि झाला आहे. नामसुधेचें महत्त्व काय वर्णावें ? नामजप हा मोठा यज्ञच आहे — पण जाऊं द्या, ह्या भक्तिरसांतल्या गोष्टींत फार थोड्यांना गोडी आहे हल्ली — पण नांव सारखें उच्चारण्यांतला रस कांहीं कमी झालेला नाही !

' मानापमानां'तला प्रसंग आठवतो का ? भामिनीवर रागावलेला धैर्यधर वनमालेवर अनुरक्त झाला आहे. त्याला ठाऊक नाही की, वनमाला म्हणजेच भामिनी हें. पण वनमाला धैर्यधराला ' भामिनी भामिनी भामिनी ' असें एकसारखें उच्चारायला सांगते. दमयंतीने नलाचें नांव कसें खुबीनें घेतलें ठाऊक आहे ? ती म्हणते, ' चेतः नलं कामयते मदीयंम् ! ' वल्लभेला, आपल्या प्रियकराने आपल्या नांवाचा घोष करावा असेंच वाटतें आणि ती स्वतः तिला कुणीं तिच्या प्रियकराचें नांव घ्यायला सांगितलें तर किती आनंद होतो—वरवर मात्र ती किती बावरते, किती आढेवेढे घेते आणि किती लाजलाज लाजते. चारुदत्तासारखा प्रौढ विवाहित गृहस्थ—पण त्यालासुद्धा प्रियेचें नांव सांगतांना आडमार्ग पत्करावासें वाटलें. त्याने विचारलें, ' सर्वांत चांगला ऋतु कोणता ? ' विदूषक मैत्रेयाने ' शरद ' सांगितला आणि कष्टाने शेवटीं सांगितला ' वसंत ' आणि मागाहून त्याने विचारलें, ' राज्याचें रक्षण कोण करतें ? ' सेना ' हें

उत्तरही त्या विदूषकाला एकदम नाही सुचलें आणि दोन्ही शब्द जुळवून तिचें नांव तयार करायला त्याने सुचवलें, तेव्हा तो म्हणाला, ' सेनावसंत ' आणि ' पदें फिरव ' म्हणून सांगतांच तो स्वतःच्या पायावर फिरला. ' वसंतसेना !' हें त्याने चटकन् नाही सांगितलें. खडीसाखरेचा खडा तोंडांत घोळवतांना जशी रुचि वाढते, तसेंच प्रिय व्यक्तीचें नांव घोळतांना होतें. आता सांगा नांवांत काय नाही ?

अहो, नांव आहेच सर्वांना प्रिय. आपण वाटेल तें टाकायला तयार होऊं, पण नांव टाकून द्यायला कुणी तयार नाही होणार ! लहान लहान मुलें पाहा. आपलें नांव सांगायला किती नाखूष असतात. आणि आपणही तसा भरीव फायदा असल्याशिवाय आपलें नांव दुसऱ्याला देणार नाही. व्यापारधंद्यांत तर नांवाला पत आहे आणि कधी कधी त्या पतीची किंमत प्रत्यक्ष धंद्यांत गुंतलेल्या भांडवलाहून अधिक असते. याचाच अर्थ आपलें नांव. संन्याशाला नांव नसतें. आपल्याला नांव आहे तोंवर सुख-दुःख संन्यास घेतल्यानंतर केवलानंद राहिला, सच्चिदानंद राहिला, निखिलानंद राहिला. तो नांवांतून मुक्त झाला. पण आपण संसार करणार—व्यापार करणार — कुलाचें व देशाचें नांव उज्ज्वल करणार — नांवाभोवतीं आपली सारी धडपड. नांवांत कांही नाही असें कसें म्हणूं तरी ? आमच्या आबांनीं एका शाळेंत १०० रुपये ठेव ठेवली आहे व तिच्या व्याजांतून त्या शाळेंतील देशस्थऋग्वेदी ब्राह्मणाच्या मुलाला २ रुपयांचें बक्षीस त्याने दहाव्या इयत्तेंत सतत मराठींत पहिल्या क्रमांकाचे मार्क मिळविल्यास द्यावयाचें आहे. आता सांगा, आबांची इच्छा कुणाला मदत करायची आहे की स्वल्पांत आपल्या नांवाचें स्मारक करायचें आहे ? आपल्या गांवांत त्यांना थोडक्या मोबदल्यांत आपलें नांव करून घ्यायचें आहे. प्रसिद्धींत कांहीच उन्माद नाही ? सांगा.

नांवामध्यें काय रुबाब नाही ? क्षत्रियकुलावतंस, गोब्राह्मणप्रतिपालक, हिंदुपदपातशाह श्रीशिवाजीराजे—किती भरघोस वाटतें ! हरिश्चंद्रगडकरकुलोत्पन्नः विजयराघवाचार्यसूनुः अश्वत्थामाचार्यशर्मा — कसें ताडभर म्हटल्यासारखें वाटतें ! मोंगल बादशहांच्या ललकाऱ्या, श्रीमंत श्रीशंकराचार्यांची बिरुदावली आणि अनेक किताबधारी अलीकडील राजे हीं नांवें कशीं भव्य वाटतात, आदरणीय वाटतात ! नांवानांवांत फरकही असतो आणि फरकही होतो. लोकमान्य बाळ

गंगाधर टिळक हें नांव उच्चारतांच उभें रहाणारें चित्र, आमचे बळवंतराव म्हणतांच मनांत येणारी नीच व्यक्ति आणि दादा म्हणून त्यांचाच झालेला उल्लेख–किती वेगळ्या वेगळ्या भावना निर्माण करतात ऐकणारांच्या मनांत. तुम्ही कोणाला कशा प्रकारच्या नांवाने हाक मारतां, यावर तुमचे संबंध स्पष्ट होतात "अहो, मिस् कमल परांजपे" आणि "ए कमू" या दोन हाकांत पुष्कळ अंतर आहे. नांव तेंच खरें. पण उच्चारण्यांतहि अर्थ बदलण्याचें सामर्थ्य आहे; मग नांवांत किती असेल ? एखाद्याशीं सलगी करणें म्हणजे त्याचें घरगुती नांव काबीज करणें–तें वापरण्याची वहिवाटीने व प्रेमाने परवानगी घेणें. मन जिंकलें तरच तें नांव जिंकतां येतें–एरवी नाही. आणि सलगीच्या नांवांत फार जिव्हाळा आहे. एका मुलीला तिच्या प्रियकराकडून आलेल्या पत्रांत 'शेवटीं तुझाच' लिहून त्याने 'डी. के. कुळकर्णी' अशी संपूर्ण सही केली होती. कुणा प्रियेला 'तुझा राजा', 'तुझा मधू', 'तुझा प्राण' हेंच अधिक आवडेल !

अहो, सारी धडपड तर नांवासाठी ! 'घटं भिन्द्यात् पटं छिन्द्यात् कुर्यात् रासभरोहणम् । येन केन प्रकारेण प्रसिद्धः पुरुषो भवेत् ॥' श्लोक ठाऊक आहे ना ? झालं तर ! प्रसिद्धिपराङ्मुख कोण आहे खऱ्या अर्थाने ? एखादा अप्रसिद्ध राहण्याच्या इच्छेने निनांवी राहून कांही लिहूं लागला तर सारे त्याच्या पाठीमागे लागतील. त्याला हुडकून काढतील. निनांवी लिहिणें समाजाला मंजूर होणार नाही. करून-सवरून नामानिराळे राहण्याची पण इच्छा अनेकांना असते ; परंतु हें तरी समाजाला कुठे मंजूर आहे ? कुणाला तरी नामधारी बनवायचें आणि त्याच्याआड दडून आपण सत्ता गाजवायची हें कांही कुणी चांगलें मानीत नाही. नांव हवेंच प्रत्येक गोष्टीला, व्यक्तीला, कृतीला 'नेम द डॉग हँग हिम' असें म्हणतात. नामाभिधान झाल्याखेरीज जातकसंस्कार पूर्ण नाहीत, तसे अंत्यसंस्कारहि पूर्ण नाही होत. जन्मण्यापूर्वी नांव होतें की नाही कुणास ठाऊक ? पण मेल्यानंतर तें काही काल तरी राहतें खास व कांही पुण्यश्लोक नामें चिरंजीवहि होतात. दुसरें कांही नाही तरी त्यांचें नांव राहतें मागे.

आणि आपलें नांव व्हावें म्हणून धडपडणें यांत वाईट कांही नाही. त्यासाठी कोणतीं साधनें वापरायचीं हा खरा प्रश्न. नांवांतली अमरता नांवांत

नाही. त्या नांवाने केलेल्या कार्यांत आहे. पुरुषोत्तम या नांवामुळे कुणी पुरुषोत्तम ठरणार नाही, लक्ष्मीकांत या नांवाने तो श्रीमंत होणार नाही. पद्मिनी नांव आहे म्हणून ती सुंदर आहे असें कुणी म्हणणार नाही. नांव धोंडोपंत आहे — पण धोंडोपंत कर्व्यांच्या कार्याचीं कोरीव लेणीं — धोंडोपंतांना अमर करीत महाराष्ट्राचीं व मानवतेचीं भूषणें ठरलीं आहेत. नांव खानखोजे — कांही चांगलें नांव नाही; परंतु क्रांतिकारकांच्या नामावलींत तें गौरवाने राहील! सांगायचें काय तर नांवांतही कर्तबगारीचें स्मरण देण्याचें सामर्थ्य येतें. केळकर, फडके, ह. ना. आपटे, वा. म. जोशी, खाडिलकर, गडकरी अशा व्यक्तींनी आमचा नामकोश संपन्न केला आहे! कुठल्या तरी क्षेत्रांत नांव घेण्यासारखें आपलें नांव व्हावें असें प्रत्येकाला वाटतें आणि तें स्वाभाविकच आहे.

नामसंन्यास कुणालाही नको आहे. साधीं किती उदाहरणें देऊं? मधूच्या लग्नांत त्याला स्टेनलेसचीं ३७ भांडीं मिळालीं; पण प्रत्येकाने आवर्जून त्यावर आपलें नांव कोरण्याची दक्षता घेतली होती! भेटींत व अहेरादाखल आलेली प्रत्येक वस्तु हेंच सिद्ध करील. आपलें शाश्वत स्मारक बनवण्यासाठी केवढे थोर प्रयत्न हे! सार्वजनिक बागेंत जा — झाडाझाडावर आपलें नांव कोरण्याची प्रवृत्ति दिसेलच. एखाद्या जुन्या प्रेक्षणीय किल्ल्यावर जा. आपलीं नांवें त्या तेथल्या भिंतींवर अमर करण्याची इच्छा! किती हजार नांवें असतात तिथे! प्रत्येक वस्तूवर माझें नांव हवें. ही सोय का हा नामप्रदर्शनाचा हव्यास!

एखाद्या देवळाला सभागृह बांधून दिलें — जीर्णोद्धारकाचें नांव आहेच! आमजनतेला या उद्धारकाचें नांव समजायला हवेंच आहे जणू! मोठमोठे किल्ले बांधणारे, मनोरे बांधणारे, अजंठा-वेरूळमधली चित्रकला-शिल्पकला सरूप करणारे, रामेश्वर-मदुरेचीं उंच देवळें बांधणारे विचारे अज्ञात राहिले! पण माझ्या असल्या-नसल्या कलेचें, क्षुद्र दानशक्तीचें कौतुक प्रगटपणे व्हायला हवें आहे! एखाद्या खाजगी समारंभाला घरची सतरंजी कुणीं दिली आणि नांव घेऊन त्या व्यक्तीचे आभार मानायचे, राहिले म्हणजे पहावें कसा राग येतो त्या व्यक्तीला! ज्यांचे आभार मानायचे त्यांच्या यादींत त्याचें नांव नाही म्हणजे काय? आला आहे कधी अनुभव? आला असला तर सांगा नांवांत काय आहे आणि नांवांत काय नाही तें!

आमचे आबा नेहमी नांव पाहूनच वस्तूची परीक्षा करतात. एका चहाच्या पुड्यावर बी. ओ. पी. अशीं अक्षरें आहेत व दुसऱ्यावर गुलाबी मिक्श्चर असें नांव आहे. मग ते म्हणतील की, हा चांगला चहा आहे आणि हा चहा वाईट. आबांच्यासारखीं पुष्कळ माणसें आहेत. आबांना चाकवताची भाजी 'मेथी'चीच आहे म्हणून सांगून वाढलें की त्यांना ती आवडते. चाकवताची म्हटली की नाही आवडत. बैठकीच्या गाण्यात कुणाला काय कळतें ? 'बुवा, आता भैरवी म्हणा की !' म्हणून भैरवी झाल्यावरही विनंती करणारे भेटतात ! कुणी तरी अगोदर सांगावें लागतें की, आता बुवा भैरवी म्हणतील व हें शेवटचें गाणें आहे. त्यानंतर गाणें संपेल — अशी घोषणा होऊनही बुवांनी भैरव म्हटला तरी अनेकांना तें कळणारही नाही. अहो, नांवावरूनच परीक्षा करण्याची आपली रीत आहे. उगाच आबांना कशाला हसायचें !

आजकालचा जमानाच बदलला आहे. 'दे दान गुप्त उपकार करी न बोले' असें जुनें सुभाषित आता बदललें पाहिजे. एक रुपया वर्गणी दिली तरी जगांत सर्वांत जास्त खप असलेल्या वृत्तपत्रांत नांव छापून यायला हवें आहे. छोटासा उपकार केला तरी त्याचा गौरव व सत्कार व्हायला हवा. जाहिरात ही आज सर्वंकषपणें जीवनाचें अंगच बनत चालली आहे आणि अशा या युगांत काय उगाचच म्हणायचें, नांवांत काय आहे ? मी तर म्हणेन जुन्या म्हणी आणि जुने वाक्संप्रदाय बदलण्याची वेळ आता आली आहे आणि म्हणूनच 'नांवांत काय आहे' हें फोल ठरत चाललें असून 'नांवांत सारें वसे' असा त्यांत बदल करायला हवा आहे.

( ऑल इंडिया रेडिओ, मुंबई केंद्र, यांच्या सौजन्याने )

* * *

१७

# परमेश्वरास

**परमेश्वरा**, रानावनांतून तुझा कुठे तरी ठाव लागेल, या आशेने हिंडलों. रखरखीत वाळवंटें ओलांडलीं ! काटेकुटे व खाचखळगे यांची क्षिति बाळगली नाही. भयप्रद अरण्यांतून वाट काढली. प्रचंड वृक्षांखालच्या निबिड अंधकाराला न भितां आत शिरलों. सभोवार अथांग सागराच्या पर्वतप्राय लाटा उसळत असतांना, तुझ्यावर विश्वास ठेवून येथवर आलों. कुठून तरी तूं 'ओ' देशील म्हणून तुला अनेकदा हाका मारल्या. पण विफलच झाले ना माझे प्रयत्न ? देवा, इतका का तूं निष्ठुर आहेस? खरंच, मला हें प्रथमच कळतें तर कशाला मी तुझ्यामागें धावत आलों असतों ? तूं अगदी माझ्याजवळ बोलल्याचा भास मला झाला होता, म्हणूनच मीं चहूकडे पाहिलें ! सर्व दिशा शोधल्या, पण तुला करुणा आलेली दिसत नाही. माझ्या निष्काम भक्तीची हीच का किंमत केलीस ?

जिण्याच्या रुक्ष वाळवंटांतून मी चाललों होतों. तापलेली वाळू व प्रखर ऊन यांचा त्रास होताच, पण समजून अगर न समजून केलेल्या गुन्ह्यांचा पश्चात्ताप मनाला काय कमी जाळीत होता ? तापलेलं डोकं एखाद्या दगडावर ठेवीन म्हटलं तर तें सुद्धा शक्य नव्हतं. मग शीतलशी छाया कुठून ?

आणि अगदी दुरून संगीताचे स्वर ऐकूं आले. किती मृदु व नादपूर्ण होते ते ! कांही क्षण मी स्वतःलाच विसरलों. तुझे—तुझेच ते आलाप ! माझं अंतःकरण उन्मत्त झालें. त्या स्वरांच्या दिशेने माझे पाय चालूं लागले. मी चालतच होतों — पण ते स्वर कुठून येत होते हें मात्र कळलें नाही. मी चाललों

मराठी ... ग्रंथालय ठाणे
२८५८ ५१
ग्रं. क्र.

होतों. एकच आशा मला होती, एकच दृश्य मला दिसत होतें—तुझा रम्य निवास !

खरंच, भीति दाखवतील अशीं गगनचुम्बी शैलशिखरं तिथें नव्हतीं. मनाला उदासपणा आणतील अशीं लांबवर पसरलेलीं माळरानें तिथें नव्हतीं. अद्भुत आकाराचे पर्वत नव्हते. भयाणता उत्पन्न करणाऱ्या खोल दऱ्याही नव्हत्या. मानवाला आपल्या सामर्थ्याची लाज वाटावी असे प्रचंड कडे नव्हते, अथवा घसरण्याच्या भीतीनं प्रत्येक पाऊल जपून टाकायला भाग पाडतील अशा पाऊल-वाटा नव्हत्या. उंच उंच अजस्र वृक्ष नव्हते, खुरटलेलीं निर्जीव रोपटीं पण नव्हतीं. लहान मुलांनी मोठ्या काळजीने आपली बाग सजवावी, तशी बाग सर्वत्र दिसत होती. सगळीं झाडें कशीं फुललीं होतीं. आणि फुलं ?—हसत होतीं, रुसत होतीं, लवत होतीं, डुलत होतीं.

किती रम्य स्थान होतें तें. अपूर्व मानवी कलेने अवास्तव नटलेले जंगी प्राकार तेथें नव्हते, किंवा निराशा व मत्सर यांनी युक्त अशा झोपड्या नव्हत्या. अनंत काल ध्येयवादी राहून अखेर खाऱ्या समुद्राला मिळणाऱ्या मोठमोठ्या नद्या तिथे नव्हत्या. वर्षाऋतूंत खळखळाट करणारे ओढे नव्हते. घडीं घडीं नश्वरतेची आठवण करून देऊन निखळून पडणाऱ्या तारका नव्हत्या व कलंक-लाञ्छनाचेंच भूषण मानणारा क्षयी चंद्रमा तेथे नव्हता. त्या प्रासादांकडे पाहून मनाला चिरकालीन सुप्रसन्नता मिळत होती. पवित्रता व समाधान यांची छाया सर्वत्र पसरली होती. त्याग व निःस्वार्थीपणा यांचें निर्मल जल कारंजा-कारंजांतून उडत होतें आणि आत्म्यांच्या उदात्त प्रेमाच्या शीतल स्नेहज्योति सर्वत्र पाजळल्या होत्या.

तेथे मी एक ओंजळभर पाणी पिईन आणि तुझें संगीत ऐकत थोडा विसावा घेईन, एवढेच माझे मनोरथ होते. हीच माझी स्वर्गाची कल्पना होती. एवढंच सुख मला हवं होतं. पण माझे पाय जास्तच दुरावले. मीं ती आशा सोडली आहे — पण तुझ्याने राहवलें नाही. तुझ्या स्वरांत कातरता उत्पन्न झाली. अन् मला वाटलें की, अखेरीस माझी तुला दया आली. पुन्हा तेवढ्याने उत्तेजित होऊन तुला शोधलें; पण छेः ! तें संगीत, ती कातरता—सर्व भास, असा माझा समज होत चालला आहे. तुझ्या निष्ठुरपणाची साक्ष

मला पटूं लागली आहे. माझ्या रुक्ष जीवनपथापासून कांही काल का होईना, पण तूं मला आपल्या नादीं लावलेंस आणि पुन्हा शेवटीं फसवलेंस !

पण छेः ! तसें मी म्हणणार नाही. जीवनाचा रुक्ष मार्ग व तेवढा काल तरी तूं नादमय व सह्य केलास ना ? आशेच्या सहवासांत तेवढें तरी सुख होतें. तुझ्याविषयींच्या मनोराज्यांत व कल्पनेच्या खेळांत क्षणभर तरी निष्प्रेम जीवनापासून दूर गेलों ना ? झालं तर मग. हीं, त्या कल्पनाबागेंत तुझ्यासाठीं जमवलेलीं, रम्य फुलें तीं मात्र तुझ्या भेटीविना सुकून जातील. मी तुझ्या दर्शनाला अपात्र ठरलों असेन, पण हीं निष्पाप फुलें-यांच्याकरिता तरी ये आणि हीं घेऊन जा. नाही तर माझ्याजवळ तीं सुकून जातील !

* * *

१८

## सागरास

तुझ्या भव्य, रुद्र, विराट् व शांत स्वरूपाकडे पाहिलें की मनांत आदर वाटतो, भय वाटतें, मानवी जीविताची क्षुद्र क्षणभंगुरता मनांत उमटते आणि तुझ्या अनंतत्वाची पूजा स्फुरते. रत्नाकरा, तुझ्या अथांग हृदयाचा अजून आम्हांला पत्ता लागलेला नाही. तुझ्या किनाऱ्यावरच्या शंख-शिंपल्यांनी आम्हीं समाधान मानून घेतलें आहे. तुझ्या हृत्कपाटांतील अक्षय्य रत्नागारांतील एक मूठभर रत्नें तरी आम्हीं उपसलीं आहेत का ?

सागरा, तुझ्यांतून लक्ष्मीकौस्तुभपारिजातकादि चौदा रत्नांचा उद्भव आहे. तूं सुधा निर्माण केलीस. हालाहलही ओपलेंस. उदारा, तुझ्या अंतरंगांत

शेषशायी आहे आणि दावानलही नांदत आहे. तुझ्या व्यापक विश्वांत मात्स्य-न्याय नांदत आहे, तसा सर्वकल्याणकारी समभावही नांदत असेल.

सरित्पते, आकाशांतून पडलेलें सारें तोय शेवटीं तुला येऊन मिळतें. साऱ्या नद्या, ओढे, नाले शेवटीं तुला येऊन मिळतात. जगांतलें सारें जीवन — त्यांतील गोडवा व क्षारता — सारें तुझ्यांत समर्पित होत आहे. तुझ्या ठिकाणीं सारीं तीर्थें आहेत. तुलाच साऱ्या जगाचीं पापें स्वीकारावीं लागलीं आहेत !

आमच्या पर्वतस्तनमंडला पृथ्वीचें तूं वसन आहेस. स्वतः प्रखर रवीचा ताप खाऊन, जीवनाचा थेंब थेंब आटवून तूं मेघरूपानें सारी पृथ्वी सुजल, सुफल, सस्यशामल केली आहेस, करीत आहेस. तुझ्या त्यागाला अंत नाही. तुझ्या कर्तृत्वाला विश्रांति नाही. तुझ्या औदार्याला तुलना नाही.

पण हे महासागरा, आम्ही तुझ्याहून मोठे आहों. मानवता तुझ्याहून प्रबळ शक्तिशाली आहे. तुझ्यावर अनेकदा आम्हीं विजय मिळवला आहे आणि तुला टाळून आणि डावलून, ओलांडून आम्ही गेलों आहों. सागरा, वेद चोरणारांना तूं दोन वेळां थारा दिलास, तेव्हा तुला वठणीवर आणावें लागलें. रामरायाला सेतुबंधास तूं विरोध केलास, पण रामबाणाचा व राम-नामाचा प्रभाव पाहतांच उरावर दगडधोंडे रचून घ्यावे लागलेच ना तुला ? आणि तो अगस्ति—आहे ना त्या कुम्भजन्माची आठवण ?

तेव्हापासून हे महोदधे, तूं मनांतल्या मनांत जळत असावास ! दिवसांतून दोन वेळां तूं आमच्या पृथ्वीवर आक्रमण करण्यासाठी येतोस — पण दोन्ही वेळां तुला माघार घ्यावी लागते. सूर्यचंद्रांची प्राप्ति व्हावी म्हणून हट्ट धरून उसळ्या घेतोस. ते जवळ येतांच — पण वेड्या, कसं शक्य आहे तें !—मग त्रागा करतोस, हताश होतोस, खडकावर डोकें आपटून घेतोस. पाण्याचे पर्वत निर्मितोस. हजारों मुखांनी, लाटांनी गरजतोस. दिशा-कोनांना धक्के देऊन ते ढासळविण्याचा प्रयत्न करतोस. पण खुळ्या, आम्ही का भिणार ?

सागरा, तुझ्याकडे पाहिलें की परागंदा झालेल्या देशभक्तांची आठवण येते. परत मातृभूमीला येण्यासाठी सागरा, त्यांचे प्राण तळमळत असतील, नाही ! सागरा, तो कोलंबस पाहिलास, गर्वगीत गातो आहे. एके काळीं आम्हीं समुद्रपर्यटन निषिद्ध मानलें होतें. आता समुद्रवलयांकित पृथ्वीची

प्रत्यहीं प्रदक्षिणा घडूं शकते आहे. महासागरा, मानवतेचें निशाण तुझ्या छातीवर नाचलें आहे. आमच्या विज्ञानानें तुला घटाकार बनवलें आहे आणि कवींनी ' महासागर म्हणजे पल्वल ' ठरवलें आहे.

सागरा, तुझी स्तुति करायला म्हणून लेखणी हातीं घेतली, परंतु निंदा करीत थांबवली, असें व्हायला नको होतें हें मलाही समजतें. पण तुझ्यासारख्या जलनिधीजवळ एक चूळभर पाणी पिण्यासाठी मागितलें तर देशील का तूं? एक थेंब तरी गोड पाण्याचा ?—चल जाऊं दे.

फुकट तुझें जिणें ! तुझी धडपड, तुझी विशालता, तुझा अथांगपणा—सारें सारें व्यर्थ आहे. महासागरा, गर्व वाहण्याऐवजीं जनसागरांतला छोटासा मीन होणें मी पसंत करीन आणि तुला पुन्हा पुन्हा बजावीन, सागरा,

अनंत अमुची ध्येयासक्ति
अनंत अन् आशा
किनारा तुला पामराला !—

* * *

## १९ आईस

त्या वेळीं मी पांच-सहा वर्षांचा असेन-नसेन. तो प्रसंग विसरून जाण्यासारखा नाही. गावांत कसला तरी उत्सव होता. त्या दिवशीं मीं आईला विचारलें, " मी जाऊं गंमत पाहायला ? " शेजारची शांता, मधू जाणार

होती आणि आईने विरस केला. खूप रागावलों मी आईवर. अंथरुणांत पडून किती तरी वेळ माझं स्फुंदून स्फुंदून रडणं चाललं होतं. आईला कांय वाटतं कीं, "मी अजून लहानच आहें?" याचाच विचार जोरजोरानें डोक्यांत घोळत होता. पण तेवढाच. आईविरुद्ध विचारांची गति कांहीं फार पुढे जाऊं शकली नाही. आई किती चांगली आहे, नाही का? तिच्यासारख्या सुंदर गोष्टी कुणालाही सांगतां येत नाहीत. खूप खोड्या केल्या तर रागावते एखाद वेळ – अं ऽ – मारते सुद्धां; पण बराच वेळ मी रुसून बसलों की लागते लाडीगुडी करायला, आणि तरी देखील मी बोललों नाही की लगेच तिचे डोळे भरून येतात. पण ••• आज मात्र आईने उत्सवाला जाऊं दिलं नाही. दुष्ट! शेजारीं शांता आहे ना, तिला आई नाही म्हणे — पण कमल म्हणाली – तिला दुसरी सावत्र आई आहे म्हणे. ती शांता आईजवळ खेळत नाही की हट्ट करीत नाही. तिची आई आणि माझी आई! आज मात्र तिनं मला जाऊं द्यायला हवं होतं. मीं माझा निश्चय पक्का करण्यासाठी ओठ आवळले. पण तेवढ्यांत आईच्या ओठांनी ते हळूच उलगडले गेले. आईचा ओला गाल माझ्या गालाला लागला आणि दोन्ही हात तिच्या गळ्याभोवती टाकून मी झटकन् तिला बिलगलों.

या गोष्टीला आज आठ वर्षें झालीं. तेच उत्सवाचे दिवस पुन्हा आले. पण आज घरांत आई मात्र नव्हती. तें मातृप्रेम–त्याला मात्र मी आंचवलों होतों. अगदी मनापासून मला 'बाळ' म्हणून कुणीं तरी हाक मारावी आणि आपलेपणानं, कौतुकानं विचारावं, असं मला वाटतं. आई, दिवसभर उन्हांत, मातींत, पाण्यांत खेळावें आणि संध्याकाळ झाली, दिवे लागले, पाखरं परतलीं की मग 'आई ऽ अ' करीत घरांत यावें, तुझ्या मांडीवर लोळावें, तुझ्या मानेभोवती दोन्ही हात घालून डोळ्यांनी व ओठांनी तुला मुका घेण्यासाठी खुणवावें, थोपटणाऱ्या मृदु मायेच्या हाताने उत्पन्न होणाऱ्या नाद-लहरींशीं, दुसऱ्या दिवशीं करायच्या खोड्यांचे व खेळांचे विचार गुंफीत हळूहळू तुझ्या मांडीवर झोपीं जावें.

आई, या गोजिरवाण्या छोट्या बालकांचा, वासरांचा, पिलांचा–आता मी मोठा झालों आहें म्हणून–मोठा हेवा वाटतो. झाडें हलतीं की फुलें खालीवर

वि:५५ 22704 2200 31/7/01

होतात. पाण्यावर तरंग उठले की कमल आंदोलतें. आई, तुझ्या अंकावरल्या आंदोलनांतील सुखाला मी आता कायमचा मुकलों का ग? आई, तूं होतीस तेव्हा सूर्यप्रकाश होता. त्या वेळीं मला वाटलें, प्रकाशाशिवाय आकाशांतलें ऐश्वर्य कोण मला स्पष्ट करून दाखवील? पण आई, तूं आता नाहीस. तुझी महती आता मला पटते आहे. प्रकाश मावळला अन् आई, तुझ्या हृदयांतल्या वात्सल्याचें व प्रीतीचें वैभव आता मला समजतें आहे, दिसतें आहे. खरंच आई, मातृवात्सल्याची मला येईल का कधी कल्पना करतां — मला नुसतेंच वाटतें की, अशा चांदण्यांत दूर दूर एकान्तांत जावें आणि तुला 'आई आई आई' म्हणून मोठ्याने हाका माराव्या. आई, होईल का त्याने माझें समाधान?

* * *

२०

## बाळास

बाळ, तुला मीं म्हटलं, रात्रीचा उत्सावाला जाऊं नकोस. किती रागावलास तूं! विनाकारण किती रागवतोस. एखादी तुला हवी असलेली गोष्ट जरा लांब धरली तर ती तुला मिळूं नये, अशी का माझी इच्छा असते? त्यांत तुझंच कांहीं तरी हित असतं. माझ्यामुळे तुला त्रास व्हावा असं कसं वाटेल मला? पाठीमागे असलेल्या ढगांमुळे चंद्राची शोभा उलट वाढतेच. बाळ शैलेंद्राचं शिखर किती उंच गेलेलं असतं—नेहमी त्यावर धुकंही असतं. त्या धुक्याचा त्याला त्रास होत असेल का? माझें सान्निध्य तुझी शोभा वाढवूं दे. तें तुला संरक्षक होऊं दे.

दोन डोळ्यांनी आपण पाहतों, पण एकच बिंब आपल्याला दिसतें. कमळ फुललं की तें खाली वाकून मातृहृदयांत पाहतें — तूं आणि मी एक होऊं या. फुलें उमललीं की झाडांना आनंद होतो — तुझा-माझा आनंद एक होऊं दे. चंद्राचें चांदणें जसें कुणाला दुखवीत नाही, तसें तूं कुणाला दुःख न देतां मोठें व्हावेंस-शैलेंद्रासारखा अढळ असावास, असें मला वाटतें. माझ्या किती तरी आकांक्षा तुझ्यांत एकवटल्या आहेत. कल्पना आहे का तुला? जगाचा मार्ग सरळ नाही. संसाराच्या उंच-सखल वाटेला लागतांना खूप अडचणी आहेत. बाळ, सारें सहन करून तुला मोठ्ठं-खूप मोठ्ठं व्हायचं आहे. तूं उदंड कीर्ति मिळवावीस आणि त्या कीर्तिध्वजाला धरून मीं स्वर्गाच्या पायऱ्या चढाव्यात, असेंच माझ्या मनांत येतें.

बाळ, आनंदाने तूं नाचत असतोस, बागडत असतोस, त्यांतच मोठ्याने ओरडतोसही. पण त्या ओरडण्याने माझ्या हृदयांत केवढें काहूर उठतें एकदम! सर्व उद्योग टाकून तत्क्षणीं मी बाहेर येतें धावत — तुला कांहीं झालं तर नाहीं ना? पण तूं स्वतःच्याच आनंदांत टाळ्या वाजवीत असतोस. किती समाधान होतें मग मला. दोन्ही हात वर करून इवलाल्या तांबूस मुठींतून माती उडवतांना तुला पाहिलं म्हणजे खरोखर माझीसुद्धा दृष्ट लागेल, अशी भीति वाटते. तुझे मोतीमोल बोबडे बोल त्या चिमुकल्यां मुखांतून बाहेर पडूं लागले की, माझ्या जिवाचे कान करून मी ऐकतें आणि मग माझ्या मनाची सात्त्विक तृप्ति होते. चिमण्या, संध्याकाळीं गाईंना आपल्या वासरांना चाटतांना पाहिलं की तुला अगदी हृदयाशीं घेऊन बसावेंसें वाटतें. खरंच, माझा आणि माझ्या सुखाचा किती तरी लोकांना हेवा वाटत असेल नाही?

हंसा, 'आई आई' म्हणून तूं मला हाक मारतोस. अहाहाऽ! माझं हृदय कसं कमलाप्रमाणे उमलतं — त्या शब्दांनी आई, आई, आई या शब्दांत माझ्या जीवनाचें सर्वस्व मला गुंफलेलें दिसतें.

गुलामा, मोठा होशील तूं. नेहमी असा लहान थोडाच राहाणार आहेस? वयानं, ज्ञानानंही तुझी वाढ होईल. पुष्कळ मोठ्या जबाबदाऱ्या तुझ्यावर पडतील व मला सोडून दूरही जावें लागेल. त्या वेळीं महत्त्वाकांक्षेच्या मागे लागलेल्या तुला, माझ्या हृदयाची कल्पना येणार नाही. पण त्या काळांत तूं यशस्वी झालास म्हणजे फक्त माझ्याच कौतुकाची भूक तुला राहील ना?

आणि जरी अयशस्वी झालास तरी माझ्याच पदराने डोळे पुसले जावेत असेंच तुला वाटेल ना ? जसा जसा तूं मोठा होशील, तसे तसे तुझ्यावर नवे निरनिराळे प्रेमबंध पडतील ; पण माझा अगदी पहिला व श्रेष्ठ प्रेमबंध मात्र तूं कधींही झुगारून देणार नाहीस ना ? बाळ, तुझ्या सौख्यांत सुख मानणारे व सुशील मित्र तुला मिळतील, अगदी अन्तःकरणापासून प्रेम करणारे व उदात्त ध्येयाकडे, सन्मार्गानेच नेणारे जिव्हाळ्याचे गुरुही मिळतील ; पण राजसा, माझ्यासारखी — हो, कांहीशा अभिमानाने मी म्हणेन — माझ्यासारखी आई तुला दुसरी मिळेल का ? बाळ — काय सांगूं आणखी ? माझें मन मला बोलून दाखवतां येत नाही रे !

* * *

२१

## शस्त्रास

तूं संहारक शक्तीचें मूर्तरूप आहेस. कुठल्याही वस्तूचा निःपात तूं करूं शकतोस. पण शस्त्रा, संहारकशक्ति ही सर्व शक्तींत श्रेष्ठ कशी ठरेल ?

तूं दुष्टांचा नाश करशील — मान्य आहे मला. पण सज्जनांचाही तूं नाश करणार नाहीस कशावरून ? कारण शस्त्रा, तूं परतंत्र आहेस. तुला वागवणारा हात व त्या हाताला वागवणारी बुद्धि ही तुझ्याहून श्रेष्ठ आहे !

तूं मोठा तेजाळ आणि दुधारी आहेस खरा ; पण तुझ्याजवळ न्याय-अन्याय, सत्यासत्य मोजण्यासाठी विवेकाचा ताजवा आहे का ? नसेल तर तुझ्या दुधारी तेजाचा दुरुपयोग होण्याचा संभव अधिक !

तूं विविध प्रकारच्या शत्रूंपासून आमचें संरक्षण करशील खरें; परंतु आमचें पोषण तूं करूं शकत नाहीस. त्यासाठी चरखा व नांगर यांचाच आधार आम्हांस घ्यावा लागेल !

शस्त्रा, शांतता व सुव्यवस्था राखण्याच्या वेळीं तूं आमच्या उपयोगी पडतोस. परंतु सुव्यवस्था निर्माण करणारे व टिकवणारे कायदे कांहीं आम्ही शस्त्रांच्या टोकांनी लिहीत नाही. तेथे बुद्धि आणि लेखणी वापरावी लागते !

शस्त्रा, तुझा पराक्रम मोठा आहे खास ! परंतु तुझ्याशिवाय प्रल्हादाने सत्याग्रहपूर्वक विजय संपादन केला आणि तुझ्याशिवाय वामनाने त्रैलोक्य जिंकलें !

शस्त्रा, तूं प्रत्यक्ष मृत्युच ! पण तुलाही न भिणारे असंख्य झाले. औरंगजेबा-जवळ संभाजीचे हाल हाल करण्यासाठी भरपूर शस्त्रसंभार होता; परंतु संभाजी त्याच्यापुढे वाकला नाही ! हृदयांतील ध्येय बाहेर टाकण्यापेक्षा तुला हृदयांत प्रवेश करूं देणारे पुष्कळ महात्मे झाले !

रक्ताने भरलेलें तुझें रूप निःसंशय रौद्र तर आहेच; पण तुझी ही रक्ताची तहान जर भागली नाही, तर स्वतःच्या स्वामीवर उलटण्यासही तूं कमी करीत नाहीस, उलट तोच तुझा जन्मधर्म झाला आहे.

आणि शस्त्रा, दुष्टांचा विनाश आणि सज्जनांचें परित्राणही तूं करूं शकशील, परंतु सत्प्रवृत्त माणसें तूं जन्माला घालूं शकत नाहीस ! सत्प्रवृत्ति तूं कशी तयार करशील ? म्हणूनच —

मी म्हणतों, तूं दुबळा आहेस. रुद्र, संहारक क्रूर असलास तरी परतंत्र आहेस. शास्ता नाहीस, पोषणकर्ता नाहीस — धिक्कार असो तुझा !

★ ★ ★

२२

# स्वा. सावरकर

**बॅरिस्टरीचा** शानदार झगा घालून अलौकिक वक्तृत्वाचा दिमाख विद्वज्जनांना दाखवीत फिरण्याची ज्यांना शक्यता, त्यांच्यवर कैद्याचे कळकट कपडे घालून कुंद कोठडींत कुजत पडण्याचा प्रसंग यावा ना! हाय रे दैवा, काय झालें हें! तात्यांची नवपरिणीत वधू उंबऱ्यावरचें माप लोटून आंत आली न आली तोंच तिला ऐकावें लागलें, "काड्याकुड्यांचीं घरटीं आणि मुलाबाळांचा संसार आपला संसार नव्हे!" आणि स्वातंत्र्याचीं स्फूर्ति-गीतें गाणाऱ्या महाकवीला काथ्याकूट करीत बसावें लागलें — यापेक्षा दुसरा दैवदुर्विलास कोणता असूं शकेल?

सावरकरांचें मन किती धैर्यशाली, पन्नास वर्षांची शिक्षा ऐकल्यानंतरही त्याची खपली देखील उडत नाहीं. सावरकरांचें मन किती मृदुल – कपोतांच्या दुःखानेंही तें व्याकुळ होतें. सावरकरांचें मन किती निष्ठुर — दर्पोद्दाम काराधिपाच्या स्नेहशून्य दृष्टिपाताच्या कक्षेंत तें पत्नीशीं तत्त्वज्ञानाच्या गोष्टी बोललें. सावरकरांचें मन किती कोमल – जें मेहुण्याच्या दिलाशानें विरघळतें. सावरकरांचें मन किती कठीण कीं, शिक्षेशीं ओळख करून घेण्यासाठी व तिच्या प्रतीकांना – बेड्यांना – खळखळवीत नेतांना हसतें, उत्सुक होतें. सावरकरांचें मन किती विशाल कीं, गोविंदसिंहासारख्या परस्थाबद्दलही तें इतकी आस्था बाळगतें, सहानुभूति बाळगतें.

सावरकर — काय झालें हें! गगनाला गवसणी घालणाऱ्या वैनतेयाचीं पिसें तर उपटलीं गेलीं नाहीत ना? आकाशांत घनगर्जना करणाऱ्या विद्युत्-

कल्लोळाला एखाद्या बाटलींत बंद तर केलें नाही ना कुणीं ? छे: ! असें कसें होईल ? सागरावरचा झंझावात का मुठींत मावेल ?

' प्रतिकूल तेंच घडेल ' अशा ब्रीदवाक्यांनीं ज्यांनी आपल्या जीवनकार्याचा पाया घातला, त्यांचा पराभव कोण करील ? अतुल त्यागाचें असिधाराव्रत ज्यांचें, ते काय गमावणार आणखी ? तुरुंगाच्या वेषांत बंदिवानाच्या दुःखद स्वरूपांत पायांत जखडून ठोकलेल्या जड बेड्यांना सहज खळखळवीत नेतांना सावरकरांना पाहिलें की मनांत चर्रर्र होतें ! काळजांत कुठे तरी कळ येते, कंठ भरून येतो, डोळे पाणावतात, हात जुळतात, मस्तक नम्र होतें आणि मुखांतून शब्द उमटतात —

स्वातंत्र्यवीरांचा जयजयकार असो !

* * *

## २३ साने गुरुजी

आकाशांत घार हिंडते, पण तिचें लक्ष पिलापाशी असतें. सानेगुरुजींचें तसेंच होतें. ते वाङ्मय लिहीत, राजकारण करीत, हरिजनसेवा करीत, पण मातृभावनेच्या गौरवाकडे त्यांचें लक्ष राही. साने का सामान्य मनुष्य होते ? ते का बौद्धिक जीवन जगत ? छे ! ते शापभ्रष्ट देवदूत होते. ते बंधमुक्त सिद्धार्थ होते — ते का गुरुजी ? ते का साधे मास्तर ? छे: ! ते मानवतेचे प्रचारक, मातृत्वाचे पुजारी, ते समाजाचेहि सात्त्विक सेवक. साने-गुरुजींनी लेखणी झिजवली, वाणी कष्टवली, शरीर राबवलें, उभा महाराष्ट्र

पायांखाली घातला. दिवसभर कष्ट करावेत, गटारें स्वच्छ करावीं, कुदळ-फावडें घेऊन भूसेवा करावी, गोवर्धनासाठी पर्वतप्राय प्रयत्न करावेत आणि रात्रीं सहृदयतेच्या अश्रूंची शाई करून लिहावें. अं हं — हा थकलाभागला कबीर रात्रीं शेले विणायचा — आणि कौसल्येचा राम त्याचा धागाधागा जुळवायचा. सकाळीं शेल्यावर रामनाम टाकून जायचा. सानेगुरुजी लिहायला बसले की तो शाम येई, तो यशोदेचा कान्हा येई, तो कौसल्येचा रघुनंदन येई, ती नामयाची विठाई येई आणि सारे सान्यांच्या लेखणींत व दौतींत सद्भाव ओतून जात. सकाळीं उठून पहावें तों कागदावर आईच्या प्रेमाचा गोरव उमटलेला दिसे. मातृहृदयाचे रंग-तरंग चमकत. वात्सल्याचे पडसाद ऐकूं येत.

समाजाच्या कल्याणासाठी त्यांनी शरीराच्या कणाकणाचें दान केलें! येशू ख्रिस्ताला क्रूसावर चढवलें तेव्हा तो महात्मा म्हणाला, 'देवा, त्यांना क्षमा कर. त्यांना समजत नाही आपण काय करतों आहों तें!' सानेगुरुजींनी आपलें मातृसदृश हृदय समाजकंटकांवर हंतरलें. तें शतशः विदीर्णही झालें; पण त्यांनी उलट त्या कंटकांना विचारलें, "बाळांनो, लागलें तर नाही ना तुम्हांला?" सान्यांचा शत्रूबद्दलही सुहृद्भाव असा आहे.

सान्यांचें सौहार्द का कस्तुरी-मृगासारखें विरल आहे? नाही. तें उमाप आहे. त्यांची मृदुता आणि मांगल्य पारिजातकांत देखील नाही. त्यांची शालीनता आम्रवृक्षांत दडलेल्या कोकिळेंत देखील नाही. त्यांचें हृदय आईचें. तें कुणीं कुणा सांगावें? आईच्या बाळालाच तें समजावें. त्यानें तें उमगावें, तें गावें. मी उगाच सांगत नाही.

कुणी म्हणतात, साने यांचें वाङ्मय रडवें आहे, हळवें आहे. त्यांना त्यांतील तेज दिसलें नाही. त्यांच्या अश्रूंतील रसायन त्यांनीं ओळखलें नाही. त्या अश्रूंनी देवळांचे चिरेबंदी दरवाजे अस्पृश्यांसाठी विरघळले आहेत. त्यांच्या अश्रूंनी बेचाळीसच्या आंदोलनांतील अनेक ज्योति प्रज्वलित झालेल्या आहेत.

कुणी म्हणतात, सानेगुरुजींचें वाङ्मय, श्रेष्ठ वाङ्मय नाही. तें श्रीखंडा-सारखें नाही. म्हणोत बिचारे! सानेगुरुजींचें वाङ्मय मला मातेच्या स्तना-इतकें पवित्र वाटतें, श्रेष्ठ वाटतें. या दुधाची तुलना का श्रीखंड-बासुदीशीं कराल? मूर्ख कुठचे! साने गुरुजींच्या वाङ्मयमूर्तीस शत प्रणाम! त्यांच्या समाजसेवेला लाख अभिवादनें! त्यांच्या मातृहृदयाला अनंत प्रणिपात!

★ ★ ★

२४

# खांडेकर

मोहरेदार अन् कोऱ्या करकरीत पुस्तकांनी भरलेलीं तीं कपाटें पाहून माझ्या मनाला जणु मोहर आला. एखाद्या लहान मुलाच्या अधीरतेने मी पुढे झालों आणि माझ्या उजव्या हातांत, वाचनालयांत परत करण्यासाठी आणलेली पुस्तकांची पिशवी होती, म्हणून डाव्या हातानेच कपाटांतल्या खणांतील दोन-तीन पुस्तकें पुढे ओढून पाहिलीं. खांडेकरांचींच होतीं तीं; पण अशीं जणु रागारागाने माझ्याकडे पाहूं लागलीं. त्यांच्यांत सामर्थ्य असतें तर त्यांनी माझा हात खसकन् धरून दूर लोटला असता. मी डाव्या हाताने त्यांना स्पर्श केल्यामुळे त्यांचा अपमान झाला होता !

मी तसा फडक्यांचा चाहता—खांडेकरांचा नव्हे. वाङ्मयाभिरुचींतही डावें-उजवें असतेंच. नाहीं म्हटलें तरी अंथरुणाला पाठ लागेतों मी सकाळचा प्रसंग विसरूनही गेलों होतों ; परंतु मीं डोळे मिटून झोपण्याचा प्रयत्न केला. एकदम माझ्या डोळयांपुढे एक आकृति उभी राहिली ती डाव्या हाताची होती. डाव्या हाताने मीं खांडेकरांना स्पर्श केल्यामुळें व पर्यायाने डाव्याला कमी लेखल्यामुळें तो क्रुद्ध झाला होता. डावा म्हणजे का अधू ? उणा ?

मी या कुशीचा त्या कुशीवर झालों. आता तरी तो हात मला दिसणार नाहीं, अशी कल्पना होती माझी. पण पुन्हा तेंच ! हां हां म्हणतां त्या हाताच्या पांचही बोटांतून अग्नि धगधगूं लागला. काय होतें आहे हेंच मला कळेना. मी टक लावून पाहूं लागलों , इतक्यांत अगदी मधल्या ज्वालेंतून हळूहळू एक मूर्ति प्रकट होऊं लागली. एक सुंदर स्त्री होती ती ! कुतूहलाने मीं विचारलें, "कोण तुम्ही ?"

" ओळखत नाहीस तूं ? " ती बोलूं लागली, " मी उल्का, मी सुगंधा, मी उमा, मी खांडेकरांची जीवननिष्ठा. खांडेकरांनी माझें चित्रण करून स्त्री ही देवता नसून एक मनुष्य आहे, हें पटवून दिलें. सुखाचा शोध, ज्वाला, अमृत, देवता या चित्रपटांत व ' कांचनमृगा 'पासून ' अश्रू 'पर्यंत त्यांनी माझ्या रूपानं मराठी वाचकांना स्त्रीविषयक वास्तववादी दृष्टिकोन दिला ! "

आणखी खूप बोलायचं होतं तिला; पण करंगळीजवळच्या ज्वालेंतून निर्माण झालेल्या एका चिमण्या आकृतीनं तिला अडवलं. ती म्हणाली, आणि बरं का, आम्हां शालेय मुलांमुलींसाठी खांडेकरांनी थोडी का सेवा केली आहे ? किती तरी सोपं आणि सरळ साहित्य त्यांनी लिहिलं. सात्त्विक व शीलवर्धक असाच दृष्टिकोन पुढं ठेवला ! उत्तम विचारांचें अत्तर सुभाषितांच्या द्वारा त्यांनीच घरोघर दरवळेल असें नाही का केलें ?

एवढ्यांत जवळच्याच अग्निज्वालेंतून निर्माण झालेल्या आकृतीने तिला पुढे बोलूं दिलें नाही, आणि स्वतःच सुरुवात केली, " अहो, दोन ध्रुवांचं दर्शन त्यांनीच तुम्हांला घडवलं. गरीब - श्रीमंत, मजूर - मालक यांचे तीव्रतम कलह गांधीवादाने मिटतील हा त्यांचा सिद्धान्त कांही फॅशन म्हणून वापरलेला नाही. त्यांनी जीवनांतील सूक्ष्म मूल्यांचाही अभ्यास केलेला आहे. त्यांची सहानुभूति आणि अनुभव यांचा परिपाक आहे तो ! "

आणि तर्जनींतून निर्माण झालेली आकृति नाचत नाचत पुढे आली व म्हणाली, " खांडेकरांचें लेखन शब्द-चमत्कृति व अलंकारांचा सोस यांनी भरून गेलेलें असतें " असं तूं म्हणतोस. बदाम — बेदाणे — चारोळ्या यांचा अतिरेक झालेल्या पक्वान्नासारखी लेखनशैली म्हणून तूं त्यांची टिंगल करतोस — तुला कांही वाटत नाही असं म्हणायला ? त्यांच्या भाषेचा गौरव समजायलाही पात्रता लागते. अरे, गडकरी, हरिभाऊ आपटे व केळकर यांच्या भाषेचा सारा अर्क त्यांच्यांत उतरला आहे.

एकामागून एक अनेक आकृत्या माझ्या डोळ्यांसमोरून जात होत्या — ते पाहा मराठी भाषेचे शिवाजी मालाकार, युगप्रवर्तक कादंबरीकार ह. ना. आपटे, साहित्यसम्राट् न. चिं. केळकर. आणि काय आश्चर्य ! — पुढे एक त्रिमूर्ति झाली. गुरुदेव दत्तांसारखी. आणि ती म्हणजे फडके — खांडेकर — माडखोलकर यांची !

मीं अत्यंत आदराने तिघांना प्रणिपात केला आणि बोलण्यासाठी वर पाहूं लागलों, तों साऱ्या आकृति नाहीशा झाल्या होत्या !

★ ★ ★

२५

## फडके

जीवनाकडे फडके उपभोगाच्या दृष्टीने पाहतात. त्यांना जीवनासाठी जीवन आणि कलेसाठी कला हवी ! आयुष्यांत भीतिदायक तत्त्वज्ञान नको. कार्यकारणभाव शोधून दुःखी - कष्टी व्हायला नको आहे. स्वच्छंद-पणाने रमत - गमत केलेली सहल म्हणजे जीवन —अशी त्यांची वृत्ति दिसते !

फडके यांची भाषा व वाङ्मयरचना अप्रतिम तंत्रबद्ध व सौंदर्यपूर्ण आहे. जातीच्या सुंदरांना कांहीही शोभतें म्हणतात — तसें त्यांच्या भाषाविलासांत कांहीही शोभून दिसतें. फडक्यांचा प्रत्येक परिच्छेद तंत्रदृष्ट्या निर्दोष तर असतोच, परंतु मृदु व ललित कल्पनांचा मनोहर गुलाबी शिडकावा हलक्या हातांनी त्यावर दिलेला असतो. शब्दयोजना, विशेषणांचा साभिप्राय उपयोग-सहेतुकपणें जोपासलेल्या राजोद्यानांतील फुलझाडांच्या मोहक ताटव्याप्रमाणे जीव लोभावून टाकणारा असतो.

एखाद्या विलासवतीच्या घनदाट आणि विपुल केशसंभाराप्रमाणे त्यांचं कल्पनावैभव आहे. त्या केशकलापाची कलापूर्ण भूषा करणाऱ्या कामिनीचें कौशल्य त्यांच्यांत आहे. त्यांतच एखादं सोनचाफ्याचं टपोरं संपूर्ण फूल जरासं तिरकस खोचून सौंदर्यप्रसाधन करण्याचं चातुर्य त्यांत आहे.

रचनेची वीण कधी एकेरी व कधी बहुविध असली तरी रेशमी आहे. अकल्पित आरंभ, मनोवेधक मांडणी आणि परिणामकारक शेवट हें तर त्यांच्या लेखनाचें वैशिष्ट्य आहे. त्यांच्या भाषेचें सौंदर्य माझ्या मनाला नेहमींच भासते आणि भाषाशैली आवडते. आणि हें सारें कां आवडतें, हें सांगणें चांगलेंच अवघड आहे. पण मी म्हणतों, सुंदर गोष्टी कां आवडतात, याचं कारण विचारतां तरी काय? आणि सांगायचं तरी काय?

* * *

## २६ चन्द्रशेखर

माझ्या संग्रहीं चंद्रशेखरांच्या काव्याचा संग्रह आहे. त्याचं नांव 'चान्द्रिका.' मी जेव्हा जेव्हा तो चाळू लागतों, तेव्हा किती तरी वर्षांचा कालखंड एकदम ओलांडून—माझ्या विद्यार्थिदशेंतील दिवस आठवतात. ती सकाळची वेळ आहे. चंद्रशेखरांमुळें तिचें पावित्र्य अधिकच वाढलें आहे. ती गोदावरी सकाळच्या कोवळ्या उन्हांत चमचम करते आहे. "जय संजीवनि जननि पयोदे श्रीगोदे भवताप हरी—" असें स्तोत्र म्हणत मी त्या प्रवाहांत डुंबतों आहें—अजून तो गोदाकाठचा "जय गंगे" हा जयघोष माझ्या कानांत घुमतो आहे.

अजून मला आठवतें. अपरात्र झाली आहे. घरांतलीं सारीं माणसें निद्रावश झालीं आहेत. उशाशीं दिवा मोठा करून मी अंथरुणावर पडलों आहें, आणि बाहेर धो धो मुसळधार पाऊस पडतो आहे. आणि 'परत ये, परत

ये, मनोमयमृगा, वय तुझें जिवलगा सरत ये....सरत ये...' ही कविता मी वाचतों आहें.

माझं मन बालकवींच्या विहंगासारखं अष्ट दिशांचा गोफ विणीत भुरभुर वर जात आहे. ती पाहा भोजराजाची राजसभा. इथे कालिदासादि कवींबरोबर चंद्रशेखर वावरत आहेत. ते पाहा प्राचीन पंडित, नर्तिका, वीर यांच्या वातावरणांत ते रंगले आहेत. मेडिकल खात्यांत एक कारकून म्हणून ते रडत नाहीत. देहभान विसरून, गाहिवरून प्रेमळ गांभीर्याने जिभल्या चाटीत चंद्रशेखर रसास्वाद घेत आहेत, देत आहेत.

ते दिवाळीचे दिवस. बडोदा दीपपक्तींनीं फुलून गेलें आहे. परंतु एका महाकवीच्या घरांत अंधार आहे. हा जातीचा भ्रमर! मधुसंचय करायला त्याला मिळतच नाहीं. उलट लाकडें फोडण्याच्या भलत्या सांकडांत तो सापडला आहे!

लोक म्हणतात, चंद्रशेखरांनी स्वतःचीं गाऱ्हाणीं गाइलीं नाहीत. समाजांतील शेकडो प्रश्नांवर सुस्कारे सोडले नाहीत. लोक म्हणतात, त्यांनी रात्र रात्र जागून कृत्रिम काव्य केलें. बाजारी तेलाचा वास येतो त्याला. लोक चर्चा करतात, चंद्रशेखर आत्मलक्षी कवि आहेत का परलक्षी याची! किती खुळे आहेत लोक तरी—कल्पवृक्षाखालीं बसून इच्छाभोजन घ्यायचें सोडून 'वाद' घालीत बसले आहेत!

अरे, चंद्रशेखरांच्यामुळे एक श्रेष्ठ काव्यानंदाचें भांडार आपल्या हातीं आलें आहे. अंधार, अवहेलना, अठरा विश्वे दारिद्र्य त्यांनी सहन केलं, याची कुठे कल्पना आहे आपल्याला? स्वतःच्याच भावना अपरोक्षपणे दुसऱ्या व्यक्तींत ओतून By Proxy रंगवल्या, हें कुठे आपण ओळखलें? त्यांनी हृदयाचें तेल जाळलें हें कुठें आपण ध्यानीं घेतलें? खरंच, चंद्रशेखरांची आठवण झाली की, हालाहल प्राशन करणाऱ्या चंद्रमौळीची आठवण होते. त्या गंगाधरानें जशी कांचनगंगा मस्तकीं धरली व भारतास दान केली — त्याप्रमाणे यांनीही महाराष्ट्राला अपूर्व असें काव्यगंगापान करवलें आणि श्रेष्ठ काव्यरस भरभरून वाटला.

★ ★ ★

२७

# माटे

श्रीपाद महादेव माटे यांचा जन्म १८८६ सालीं झाला. त्यांचें शिक्षण फर्ग्युसन कॉलेजांत झालें. एम्. ए. झाल्यावर नू. म. वि. मध्ये ते शिक्षक झाले व एक उत्कृष्ट शिक्षक म्हणून त्यांनी कीर्ति मिळवली ! अस्पृष्टांच्या उद्धाराच्या कामांत त्यांनी खूप झीज सोसली. 'अस्पृष्टांचा प्रश्न' हा चिकित्सापूर्ण ग्रंथ त्यांनी लिहिला. त्यांचा समाजशास्त्राचा अभ्यास सखोल आहे. विज्ञानबोधाची प्रस्तावना याची साक्ष देईल. उपेक्षितांचें अंतरंग, अनामिका, आपापलें हितगुज, माणुसकीचा गहिवर इत्यादि ललितसाहित्य देखील त्यांनी लिहिलें आहे !

सातारकडच्या मराठ्याची रांगडी पण भावमधुर बोली कुणाची असेल तर माट्यांची ! जशीं कांही बिनबियांचीं वांगींच. महाराष्ट्राच्या उपेक्षित समाजाच्या अंतरंगाचा जसा कांही ठावच घेतला त्यांनी. मराठींतील अनेक अल्पपरिचित आणि उपेक्षित शब्दांचा उपयोग त्यांनी केला ! माट्यांच्या लेखनशैलीला शहरी सुमनांचा साजशृंगार नाही; परंतु रानवट फुलांचा तजेला आणि नवलाई आहे. या वनलतांनी राजोद्योनांतील जोपासलेल्या पुष्पलतांना मागे टाकल्यासारखें दिसतें.

माट्यांनी आपल्या शब्दांची जडण-घडण अशी बनवली की वा ! त्यांच्या भाषेस प्रादेशिकपणाचा मुळी सुद्धा वास येत नाही. माडगूळकर, दिघे, पेंडसे यांच्याहून ती निराळी आहे. आणि याचें कारण असें आहे की, माट्यांची सहृदयता अत्यंत विशाल आहे. जीवनाकडे पाहण्याची त्यांची दृष्टि प्रसन्न आहे. नवे विषय, नवें क्षेत्र, नवे शब्द यांमुळे त्यांनी 'मराठींतील एक नवा शैलीकार' हें स्वतंत्र स्थान पटकावलें आहे !

* * *

२८

## परांजपे

**क्रांतीच्या** कलाकारा, देशभक्तीच्या उद्रेका, स्वातंत्र्याच्या मांत्रिका, तूंच का ' भासाची भवितव्यता ' हा लेख लिहिला आहेस — होय — भासाबद्दल तुला साधर्म्य वाटावं, सहानुकंपा वाटावी, यांत नवल तें कसलें? आपल्या शब्दशरांना उपहास-वक्रोक्तींचीं पुटें चढवणाऱ्या धनुर्धरा, तुझ्या लेखांवर असाच एकदा अग्निवर्षाव झाला, तेव्हा तुझ्या डोळ्यांतून अग्निकण बाहेर पडले, त्यांनीच नाही ही देशक्रांति पेटली? सर्पाच्या गतींतील लालित्य आणि विषार यांचें मनोहर मिश्रण आपल्या लेखनशैलीने निर्माण करणाऱ्या कलाकारा, भासाप्रमाणे तुझा आत्मा आता विव्हल व्हायचं कारण नाही. काळानं गिळलेलीं तुझीं माणकं आता वाग्देवीच्या कंठहारांत झळाळत आहेत.

भासावर ' येऊं नये असा ' प्रसंग आला. त्याचीं नाटकें कुणा दुष्टाने जाळलीं कां? ती वनदेवतांनी कां संरक्षलीं नाहीत? कुणा राजाने भासाला ही शिक्षा कां दिली? कुणी यक्षगंधर्व त्याच्या मदतीला धावून कां आले नाहीत? त्या गुणाढ्याप्रमाणे त्याने स्वतःच तर त्यांचा नाश केला नसेल? त्यांची अग्नि-परीक्षा का कुणीं केली? मेघांनीही आपला अमृतवर्षाव केला नाही त्या वेळीं?

शिवरामपंत, अनेक शंका आपणच उपस्थित केल्या आहेत. आपण मोरो-पंतांच्या संशयरत्नमालेवर ताण केली आहे. मोरोपंतांची कविता केवळ भक्तींत घोळली आहे आणि आपण आपली प्रतिभा उपरोध-विडंबनांत नटवली आहे! ती कारुण्याने थबथबली आहे. आपला हा निबंध, हा का निबंध? हा पारतंत्र्यरावणाला जिंकण्याच्या विजयमार्गावरील सेतुबंध! शिवरामपंत, आपल्या निबंधांत परशुरामाचें रुद्रदर्शन आहे आणि प्रभु रामाचें शांतदर्शन

आहे. आपण एकीकडे परतंत्र अर्जुनासारखे भासतां तर एकीकडे, 'न धरीं शस्त्र करीं' अशी प्रतिज्ञा करणाऱ्या श्रीकृष्णासारखे भासतां.

आपली भाषा — अं हं — ही भाषा महाराष्ट्राची भूषा आहे, क्रांतीची उषा आहे, उद्याची आशा आहे! इथे का नाटकीपणा आहे? हा का वरवरचा नटवेपणा आहे? छेः! इथे उल्हास आहे अलंकारांचा; परंतु ते अलंकार आहेत विचारांचे. इथे उमाळा आहे — इथे कारंजांचे नर्मतुषार नाहीत. इथें यज्ञज्वालेचें अग्निनृत्य आहे. इथे विद्युल्लतेची छुरी चाहूल आहे. इथे का गुलाबदाणींतल्या गुलाबपाण्याचे चार थेंब आहेत? छेः! इथे मशालीवर ओतलेली स्नेहधारा आहे!

लेखणीचा वाजवी अभिमान बाळगणाऱ्या, मराठी भाषेच्या भाग्यवंत मानकरी महापुरुषा, तुझा आवेश, तुझा आक्रोश, तुझी विव्हलता — तुझी आत्मनिष्ठा का वाया गेली? भासाच्या भवितव्यतेची काळजी तूं वाहिलीस. तुझी इच्छा आम्हीं पूर्ण केली आहे. इंग्रज गेले आहेत 'काळाला' जप्त करूं पाहणारे ते गोरे आम्हीं घालवले आहेत! तुला ज्या साहेबाच्या कचेरींतील मतलबी स्तुतिपाठकांचें भय वाटलें, तसले लोक आता इथें नाहीत. शब्दाच्या शूर शिकंदरा, तुझा अश्वमेध पुरा होऊं नये म्हणून देशी - विदेशी शत्रूंनी तुला का कमी छेडलें? काळाला जिंकून विदग्ध वाङ्मय आतां काळाधीन व दग्ध न होतां अमर झालें आहे!

महाशय, आपल्या लेखणींत लालित्य आहे, शब्दांत शुचिता आहे. अर्थव्यक्तींत अंतर्हित अंगार आहे. परिच्छेदापरिच्छेदांत पराक्रमास प्रबोधन आहे व प्रस्फूर्त प्रज्वल प्रतिभेचे प्रमत्त आविष्कार पदापदांत प्रतीत होत आहेत! आपण आपल्या वाग्विलासाने स्वतःस आणि महाराष्ट्रीय व राष्ट्रीय वाङ्मयास सौभाग्यलेणें चढवलें आहे. पारतंत्र्यकालांत स्वातंत्र्याची पहाट सूचित करणाऱ्या शुक्रताऱ्याप्रमाणे आपण तेजस्वी ठरलां आहांत? आपण या मराठीच्या प्रांगणांत देशभक्तिपर वाङ्मयाचा बालमंदार वृक्ष आणून लावलात. त्याला सुविचारांचें पाणी दिलेंत आणि आता त्याच वृक्षाचीं — छाया फुलें यांचा उपभोग आम्ही लुटीत आहोंत.

महाराज, आपल्या प्रत्येक निबंधांत पारतंत्र्याची व पराभूतवृत्तीची चीड आहे. पैशुन्य व परप्रत्यय नेयबुद्धि यांचा अधिक्षेप आहे! आपलें लेखन दाहक

आहे, पण तें शामक वाटतें. ती ओली आग आहे. वरून शीतल भासत असली तरी दाह केल्यावाचून सोडणार नाही. आपला बाण सोन्याचा आहे की लोखंडाचा, याचा नाही आपण विचार करीत – तो विषानें भरपूर माखला आहे ना, एवढंच पाहतां. वाघिणीच्या गतीनें विळखे मारीत आपली लेखणी एकदा पल्लेदार कल्पना करीत निघाली की तो आवरणें कठीण आहे! आपण मराठी भाषेंत क्रांतिरस हा दहावा रसच निर्माण केला म्हटलें तरी चालेल.

आपले निबंध मराठी वाङ्मयाचीं अमरभूषणें आहेत!

* * *

२९

## रससौंदर्य

१. वीररसांत पुरुषार्थ आहे. रौद्र हा वीराचा आविष्कार आहे, तर करुण वीररसाचें पर्यवसान आहे. शृंगारवृत्ति ही वीराची सखी आहे आणि क्षमा शांति वीराची धात्री आहे. शृंगार वीरांना शोभतो, क्षुद्र-दुर्बलांना नाहीं. स्वप्रतिष्ठा, स्वाभिमान, स्वत्वाचें उन्नयन यांत शौर्य आहे, वीररसाचा आविर्भाव आहे. वीर हा जीवनांतला स्थायीभाव आहे. पोषण व आक्रमण, संरक्षण आणि संहार यांच्या तेजानें तो तेवतो. वीररसाची पायाभरणी अशी होते.

* * *

२. शृंगारांत अनुनय आहे, आराधन आहे आणि बलात्कारही. सागराच्या ओढीनं असंख्य दरडी ओलांडत, असंख्य भुजांनी आणि प्रचंड वेगानें

सरिता त्याच्या मिठींत धावते आणि तोही तिच्या मीलनासाठी हेलावत असतो. एक दुसऱ्यावर अवलंबून. सरिता - सागर. द्वैतांतून अद्वैत ! कृष्ण राधारूप होतो आणि राधा कृष्ण बनते. शृंगाराची ही परमावधि.

भोगांत शृंगार आहे का ? नाही. मुळीच नाही ! त्यागांत आणि विरहांत, एकलेपणांतही आहे. चंद्रिकेसाठी सागर उचंबळतो. सूर्यापाठी पृथ्वी फिरत राहते. परमात्म्याच्या विरहाने झुरणारी जीवशक्ति मीलनासाठी पुढे सरते, मागे फिरते. ती हुरहुर आणि तो संभ्रम समजून घ्यायला मात्र हवा.

* * *

३. सुख पाहातां जवापाडें—दुःख पर्वताएवढें ! जीवन हा सुख दुःखांचा हिंदोला आहे, असें म्हणतात; परंतु त्यांत दुःखाचा झोलाच मोठा. जीवन ही संगमवियोगाची माला आहे. परंतु असंख्य वियोग-अश्रूंनीं अभिषिंचित आहेत. जगांतला पहिला महाकवि वाल्मीकि —त्याचें पहिलें महाकाव्य शोकांतून स्रवलें ! जीवनाचा शेवट आसवांजलीनें व्हावयाचा आहे. जें नाही त्याच्यासाठी आपण नेहमी आक्रंदत राहतों. ही जीवनाची प्रकृति. क्षणभराचं हास्य — विजेसारखं क्षणभर तळपतं इतकंच ! सहानुभूति ही कारुण्याची हाक आहे !

* * *

४. समुद्राची वाफ पाय न वाजवतां आकाशांत जन्मते. परंतु प्रचंड घन-गर्जना करीत रुद्रावताराने शेवटीं प्रकटते ! शूल खणखणत येणाऱ्या सर्व संहारक महारुद्राचीं तांडवी पावलें अनंत कोटि ब्रह्माण्डाला खडबडून जागें करणारीं असतात. आपल्यासमोर आपल्या स्त्रियांना जोहार करायला सांगणारे राजपूत आणि पतीसह चितारोहण करणाऱ्या उग्रमंगल सुवासिनी, हृत्कपाट फोडून त्यांतून गटगटां रक्त प्राशन करणारा महाबाहु भीम आणि हृदय फाडून प्रभु रामाचा साक्षात्कार घडविणारा महाबळी हनुमान आपणांस प्रियच आहेत. क्षमादान हा वीरांचा डावा हात आहे, तर रुद्र हा उजवा ! आणि सव्यसाची योद्धा दोन्ही हात सारखेच मानतो.

* * *

५. भीति हें संरक्षणाचें कवच आहे. भीति ही आक्रमणाची ढाल आहे. भीति ही लज्जेची सहोदरा भगिनी आहे. भीति ही आदराची चाहूल असूं शकते. भयानकतेंत विस्मय आहे आणि दुःखही. भयानकता ही वीरवृत्तीला आवाहन आहे. भयाकुलता, कारुण्याच्या पार्श्वभूमीवर, नयनांना पाझर फोडणारी आहे! भय ही सहजप्रवृत्ति आहे. जन्म असो, मरण असो, विवाह असो, भयंकर युद्ध असो, आपण सभय वाट पाहत असतों दारीं. जे निर्भय आहेत, ते निःस्पृह आहेत, विरक्त आहेत किंवा मुक्त आहेत. भयानकता एकसारखी सावलीसारखी (आणि सावलीची पण भीति वाटते!) आपल्या मागे-पुढे आहे!

* * *

६. उगाच नाही सिद्धार्थाला जीवनाचा उबग आला! आपण स्वतः आपलें शरीर आरशांत पाहतों. अं हं, चुकलें आपण आपलें प्रेत पाहतों तें! किती धाणींतून तें आलें आहे. आंत किती घाण आहे आणि कुठल्या घाणींत, वैराग्य-स्मशानांत, भूतपिशाच्च-घुबडांच्या संगतींत तें सडणार आहे–जळणार आहे! सुग्रास जेवण? छे — कोळसा — किंवा असंख्य जीवजंतूंचा फराळ करणार आहोंत आपण. इंद्रियसुख — किती किळसवाणी प्रक्रिया एकेक! सुरूपता ही कुरूपतेवर टिकली आहे. बाह्य आवरण जरा बाजूला करा. आंत घाण आहे नुसती. मग ती सजीव असो, निर्जीव असो, मानसिक असो, या बीभत्साची ओळख पटेल तरच निर्वाणाचा वा मोक्षाचा अमर मार्ग लाभेल!

* * *

७. कोठून आलों आणि कुठे जाणार? अंधारांतून आलेला अंधारी रस्ता अंधाराकडे चालला आहे. जन्म हा अद्‌भुत आहे. निद्रा अद्‌भुततर आहे आणि मृत्यु तर अद्‌भुततम आहे. प्रेम तर मूर्तिमंत अद्‌भुत! अकारण स्नेह— अकारण द्वेष हे गेल्या जन्मींचे लागेबांधे—किती अद्‌भुत. समुद्राने पौर्णिमेला कवळायला उसळी घ्यावी हें नाही का अद्‌भुत? मन विस्मित होतें — विश्वरूप-दर्शनाने. अर्जुन त्या अत्यद्‌भुत दर्शनाने जसा गांगरला, तशीच आपली स्थिति होईल. कोणत्या तरी अद्‌भुतापाठी मन वरवर येतें. गुलबकावलीसाठी धावतें.

मयसभेंत रंगतें. चंद्रावर जातें — अद्‌भुत रोमांचकारी गोष्टींत रमतें किंवा जीवनांतील अद्‌भुतता शोधतें.

★ ★ ★

८. करुण हा काळाकुट्ट ढग असेल तर हास्य ही त्याची रुपेरी कडा आहे. विसंगति दुःखदायक तर खरीच पण तीही सुसह्य करण्याचें सामर्थ्य व कौशल्य हास्यांत आहे. बालकांचें सहज हास्य, प्रमदांचें आरोग्यपूर्ण निर्मल मंद स्मित, साधूंचें वरद अभयप्रद चिरंजीव हास्य — कांटेरी जीवनांतही सुखाचे गुलाब फुलवल्याविना रहात नाहींत. संसृतीवर विजय प्राप्त करायला विनोदासारखें दुसरें हत्यार नाहीं, विकृतींतून हास्य निर्माण होत असलें तरी हास्य म्हणजे विकृति नव्हे !

★ ★ ★

९. संतांचें हृदय म्हणजे शांत सरोवर. निर्मल आकाश. राजहंसाचा निःशब्द विलास. आस्वर्ग शांत शांत झाला आहे, अशी कल्पना करा. ज्याला जें हवें आहे, तें त्याला मिळालें आहे. अमंगलत्व नष्ट झालें आहे. द्वेष संपला आहे. मत्सर निवाला आहे. हर्षखेद मावळले आहेत. कुठे तरी बुडून नष्ट होण्याची जीवात्म्याची धडधड संपली आहे. हरवलेलें सांपडलें आहे. 'होतें तें' शून्यांत हरवलें आहे. मन हलकें फूल झालें आहे. तें डोलत नाही की हलत नाही ! आनंद, प्रसन्नता व संपूर्णता यांनी भरलेलें शून्य मात्र राहिलें आहे !

ॐ शांतिः शांतिः शांतिः ।

★ ★ ★

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 22२७६ दि. ...
क्रमांक ....११०३... नों: दि: ...

विद्यार्थ्यांनो ! !

## हीं पुस्तकें वाचा ! ! !

**★ साहसी सत्यकथा** लेखक : भा. द. खेर
किंमत १ रुपया

साहसविषयक वाङ्मयाची मराठींत उणीव आहे आणि म्हणूनच साहसप्रिय तरुण विद्यार्थी वाचकांना या साहसी सत्यकथा वाचून जीवनाची एक निराळी अनुभूति प्रत्ययास येईल.

**★ युद्धकालीन कथा** लेखक : भा. द. खेर
किंमत १ रुपया

'युद्धस्य कथा रम्या' ही उक्ति प्रसिद्ध आहे. कपोल-कल्पित कथापेक्षां सत्यकथांची आवड हल्लीं वाढूं लागली आहे. आणि म्हणूनच सत्याची बैठक असलेल्या या कथांना एक प्रकारची अवीट गोडी निर्माण झाली आहे.

**★ आषाढी कार्तिकी** लेखक : भा. द. खेर
किंमत १॥ रुपया

महाराष्ट्र ही संतांची पावनभूमि आहे. ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ व तुकाराम या चार संतांनीं अध्यात्म व भक्ति यांचा अमोल ठेवा आपणांस देऊन ठेवला आहे. त्यांच्या कार्याचें महत्त्व हें पुस्तक आपणांस उलगडून सांगेल.

**★ ओवाळणी** लेखक : लखजी आंबराईकर
किंमत १ रुपया

प्रत्येक देशांत अनेक तेजस्वी क्रांतिकारक व देशभक्त होऊन गेले. त्यांच्या कार्याची उदात्तता उलगडून दाखविल्यास त्यांच्या जीवितकार्याचें स्वरूप समजून येतें. यासाठीं या कथा एकदां अवश्य वाचा.

इनामदार बन्धु, ९९१ सदाशिव, पुणें २.

विद्यार्थ्यांनो !!

## हीं पुस्तकें वाचा !!!

### ★ गुपित

लेखक : दि. वा. मोकाशी
किंमत १ रुपया

' कुमारांचें मानसशास्त्र ' कळून घेण्यासाठीं थोडा वेळ ' गुपित ' पुस्तकाच्या अंतरंगाची चाहूल घ्या. बंडू, वासू, शांती, श्रीकान्त व परश्या हीं व्यक्तिचित्रें आपणांस नक्की विचार करावयास लावतील. **पालकांनो** आणि **शिक्षकांनो**, आपण वाचा आणि मुलांच्या हातीं द्या !

### ★ सत्तावनचे सप्तर्षि

ले : म. श्री. दीक्षित
किंमत १। रुपया

सत्तावनच्या क्रांतियुद्धांतील आठ वीरांचीं चरित्रें या पुस्तकांत समाविष्ट आहेत. शिवाय सत्तावनच्या क्रांति-युद्धांतील महत्त्वाच्या घटनांचा कालपट.

### ★ पटाचारा आणि बुद्धशिष्या

लेखक : **अहिल्या सामंत, किंमत ·।।।· आणे**

दुर्गा भागवत आपल्या प्रस्तावनेंत म्हणतात : लेखिकेनें मार्मिकपणें लहान-थोरांना आवडेल अशा सहज मनोहर शैलीनें कांहीं प्रमुख भिक्षुणींच्या चरित्ररेखा या पुस्तकांत मांडल्या आहेत.

### ★ पेशवाईतील रत्नें

ले : म. श्री. दीक्षित
किंमत १ रुपया.

उत्तर पेशवाईत अनेक कर्तृत्ववान् व महत्त्वाकांक्षी व्यक्ति होऊन गेल्या. देशाच्या दृष्टीनें त्यांचें शौर्य कारणीं लागलें नसेल; पण त्यांच्याहि जीवनांत कांहीं परमोच्च गुण होते. त्या त्यांच्या गुणदोषांचें व्यक्तिचित्रण देशाचें भवितव्य उज्ज्वल करूं पाहणाऱ्या विद्यार्थ्यांस मार्गदर्शक ठरेल.

**इनामदार बन्धु, प्रकाशन, पुणें २.**

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
९४५८
रो. क्र.

REFBK-0009457